अविनाश शिरसाठ
७०६६७७४४७७
गुरु एन्टरप्रायजेस
सी.सी.टी.व्ही. विक्री आणि सेवा
सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे संपुर्ण समस्या खात्रीशिर सोडविल्या जातील.
इंदिरानगर, दत्ता मंदिरा मागे, एयरटेल टॉवर शेजारी,
श्रीरामपूर-४१३७०९

दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री

**व्हिडिओ व्हॅनसाठी ड्रायव्हर पाहिजे**




श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे व्हिडिओ व्हॅनसाठी ड्रायव्हर पाहिजे. निर्व्यसनी, निरोगी आणि किमान १० वी पास चालकास प्राधान्य देण्यात येईल. पगारासह इन्सेन्टिव्ह मिळेल.
संपर्क : 7588605255

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक १७३ ● बुधवार, ०२ एप्रिल २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## झापुक । zupuk

मराठीची सोडून
जेव्हा इंग्रजीची
धरली कास
कंबरेचे सोडून
इंग्रजीने आवळला
मराठीच्या गळ्याचा फास
ज्यांनी मराठीचे सोडून
आपल्या पोरांना इंग्रजीचे
बोट धरायला लावले
तेव्हापासून पप्पा
मम्मीसाठी वृद्धाश्रम
वाढू लागले
मराठीवाले आईबाबा
आजही आपापल्या घरात
आनंदी आहेत
इंग्रजीवाले पप्पा मम्मी
वृद्धाश्रमात दुःख
भोगत आहेत

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

## महत्वाचे...

### राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांची पुण्यात दोन दिवसीय कार्यशाळा

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहिर केलेल्या राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाचा आढावा घेण्यासाठी येत्या ४ आणि ५ एप्रिलला पुण्यात राज्यभरातील जिल्हाधिकाऱ्यांची दोन दिवसीय कार्यशाळा घेण्यात येणार आहे. यात राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, तसेच महत्त्वाचे महसूल अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार संबोधित करणार आहेत. बालेवाडी येथील द ऑर्किड हॉटेल येथे ४ आणि ५ एप्रिल रोजी ही कार्यशाळा पार पडणार आहे. यात राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक संचालक, जमाबंदी आयुक्त तथा संचालक, महसूल विभागाचे सर्व अपर आयुक्त, राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महसूल विभागाचे सर्व सहसचिव, उचसचिव, सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

### ३२२० जन्म व मृत्यू प्रमाणपत्र रद्द

**अकोला :** वाशीम जिल्ह्यात नायब तहसीलदारांनी निर्गमित केलेले तीन हजार २२० जन्म व मृत्यू प्रमाणपत्र रद्द करण्याचा आदेश जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी दिला. रद्द केलेल्या प्रमाणपत्र प्रकरणी फेरचौकशी करून निर्णय घेतला जाणार आहे.जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारणा अधिनियम २०२३) मधील कलम १३ (३) अन्वये ज्या कोणत्याही जन्माची किंवा मृत्यूची तो घडल्यानंतर एक वर्षाच्या आत नोंदणी करण्यात आली नसेल त्याची नोंदणी खातरजमा करून जिल्हा दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी किंवा प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या आदेशावरुन करण्याची तरतूद आहे. वाशीम जिल्ह्यात कार्यकारी दंडाधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशान्वये नायब तहसीलदार महसूल व निवासी नायब तहसीलदार यांना अधिकार दिले होते. या अधिकारानुसार वाशीम जिल्ह्यात तीन हजार ०६३ जन्म, तर १५७ मृत्यू असे एकूण तीन हजार २२० प्रमाणपत्र नायब तहसीलदारांनी निर्गमित केले होते.

### १३ वर्षीय बालकाकडून महिलेचा खून

**जालना :** मोबाईल फोन पाटाच्या पाण्यात टाकून दिल्याच्या रागातून एका साडे तेरा वर्षीय बालकाने ४१ वर्षीय महिलेचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना पोलीस तपासात समोर आली.मीराबाई उर्फ संध्या राजाभाऊ बोंडारे, असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. मीराबाई या घनसावंगी तालुक्यातील आंतरवाली टेंभी येथील रहिवासी. त्यांचा २५ मार्च रोजी शेतातच मृतदेह आढळून आला. याप्रकरणी मीराबाईंचा भाऊ अंकुश सदाशिव औटे (रा. आपेगाव, ता. पैठण) यांनी दिलेल्या तक्रारीवरून तीर्थपुरी पोलीस ठाण्यात सुरुवातीला अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास केला असता काही पुराव्याच्या आधारे पोलिसांना एका विधिसंघर्षग्रस्त बालकाने मीराबाईचा खून केल्याचे धागेदोरे मिळाले.

# आज वक्फ विधेयक

## चंद्राबाबू, नितीशकुमारांचे सरकारशी सुत जुळले!




### भाजपाचा व्हीप जारी

लोकसभेत वक्फ विधेयक सादर होण्यापूर्वी भारतीय जनता पक्षाने सर्व लोकसभा खासदारांना आज म्हणजेच २ एप्रिल रोजी संसदेत उपस्थित राहण्यासाठी व्हीप जारी केला आहे. दुसरीकडे, विरोधकांनी या विधेयकावर चर्चेसाठी १२ तासांच्या वेळेची मागणी केली आहे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** वक्फ (संशोधन) विधेयकाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. हे विधेयक बुधवारी (दि. २ एप्रिल) लोकसभेत मंजुरीसाठी सादर केले जाणार आहे. पण त्याआधी मोदी सरकारने आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या पक्षाने केलेल्या मागण्या मान्य करत सेफ गेम खेळाला आहे. हे दोन्ही पक्ष लोकसभेत विधेयकाच्या बाजूने मतदान करणार आहेत.

वक्फ विधेयकातील तरतुदींवरून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. तसेच विधेयकातील काही तरतुदींवर एनडीएतील तेलगू देसम पार्टी आणि संयुक्त जनता दलाचाही विरोध होता. अखेरीस दोन्ही पक्षांनी दिलेले प्रस्ताव सरकारला मान्य करावे लागले आहेत. त्यामुळे विधेयकावर लोकसभेत मतदान झाल्यास सरकारला कोणताही धोका असणार नाही.

टीडीपीने विधेयकात तीन महत्वाचे बदल सुचवले होते. 'वक्फ बाय यूझर' मालमत्ता ज्या वक्त सुधारित अधिनियम लागू होण्यापूर्वी नोंदणीकृत झाल्या आहेत, त्या मालमत्ता वक्फ बोर्डाच्याच राहतील. जोपर्यंत संबंधित मालमत्तांबाबत कोणताही वाद निर्माण होणार नाही किंवा सरकारी मालमत्ता असेल, तोपर्यंत या मालमत्ता वक्फच्या असतील, अशी महत्वाची सुधारणा सुचवण्यात आली होती. ती मान्य करण्यात आली आहे.

वक्फ सुधारित अधिनियमामध्ये वक्फ प्रकरणांशी संबंधित सर्व निर्णय घेण्याचे अधिकारी संबंधित भागातील जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. टीडीपीने यात बदल करण्याची सुचना केली होती. त्यानुसार आता जिल्हाधिकाऱ्यांऐवजी राज्य सरकार एक अधिसूचना काढत त्यांच्यापेक्षा वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांना नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करेल. तेच वक्फशी संबंधित प्रकरणांचा तपास करतील. हा बदलही विधेयकामध्ये करण्यात आला आहे.

टीडीपीने डिजिटल कागदपत्रे सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्याचीही सुचना केली होती. वक्फला डिजिटल कागदपत्रे सादर करण्यासाठी अतिरिक्त सहा महिन्यांचा वेळ या बदलानुसार मिळणार आहे. या तीनही सुचना मान्य केल्यानंतर **(पान ४ वर)**

# शासकीय कामकाजात वाढणार कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापर

- **मार्वल शासकीय कंपनीसाठी शक्ती प्रदत्त समिती स्थापन**
- **पुणे-संभाजीनगर महामार्गावर सर्व वाहनांना पथकर**



**मुंबई :** राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर व्हावा यासाठी मार्वल या शासकीय कंपनीच्या कामाची व्याप्ती वाढवण्यासाठी शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्याचा निर्णय मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. दरम्यान पुणे-शिरूर अहिल्यानगरमार्गे संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाच्या विस्तारित बांधणीनंतर सर्व प्रकारच्या वाहनांवर पथकर **(पान ४ वर)**

### बाईक टॅक्सीसाठी ग्रीगेटर धोरण जाहीर

राज्यातील एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या सर्व शहरांमध्ये दुचाकी (बाइक) टॅक्सी समुच्चयक ग्रीगेटर सेवा सुरू करण्याबाबतचे धोरण लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. बाईक टॅक्सी वाहनांचे समुच्चयक धोरण ठरविण्यासाठी गठीत केलेल्या रामनाथ झा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशीनुसार हे धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्यातील नागरिकांसाठी वाहतुकीचा किफायतशीर आणि सोयीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. या धोरणांतर्गत बाईक टॅक्सी सेवा देणाऱ्या समुच्चयकांकडून इलेक्ट्रिक बाईक वापराव्या लागणार आहेत. त्या पिवळ्या रंगात रंगवलेल्या असतील. हा पर्याय पर्यावरणपूरक व रोजगार उपलब्ध करून देणारा हा पर्याय आहे. यातून मोठी रोजगारनिर्मिती होणार असून महिला चालकांना देखील प्रोत्साहीत केले जाणार आहे.

# सहकार महर्षी थोरात कारखान्याची ११ मे रोजी निवडणूक

## उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

### विखे पाटील लक्ष घालणार?

माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या ताब्यातील गणेश कारखाना काढून घेण्यासाठी त्या वेळच्या निवडणुकीत बाळासाहेब थोरात यांनी विवेक कोल्हे यांना साथ दिली. त्यानंतर सहकारी आणि सार्वत्रिक निवडणुकांमध्ये थोरात आणि कोल्हे यांनी विखे विरोधी आघाडी उभारली. त्यात त्यांना काही वेळा यश आले तर काही वेळा अपयश. त्याचा वचपा काढण्यासाठी विखे पाटलांनी विधानसभा निवडणुकीत संगमनेरमध्ये बाळासाहेब थोरात यांच्या होम पिचवर नवख्या उमेदवाराच्या हस्ते त्यांचा पराभव केला. आता कारखाना निवडणुकीतही विखे पाटील लक्ष घालणार का? याबाबत जिल्ह्यासह राज्यात चर्चा आहे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** संगमनेर येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाचा पंचवार्षिक २०२५-३० साठीचा निवडणूक कार्यक्रम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांनी जाहीर केला आहे. ११ मे २०२५ रोजी मतदान होणार असून १२ मे रोजी मतमोजणीनंतर निकाल घोषित केला जाणार आहे. नामनिर्देशन पत्रे निवडणूक निर्णय अधिकारी संगमनेर यांच्या कार्यालयात ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत साप्ताहिक व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मिळतील व




स्वीकारण्यात येतील. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी १५ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. उमेदवार १५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत अर्ज मागे घेऊ शकतात. माघारीनंतर प्रत्यक्ष निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निवडणूक चिन्ह वाटप २ मे रोजी करण्यात येईल. या निवडणुकीसाठी संगमनेर उपविभागीय अधिकारी शैलेश हिंगे यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून, **(पान ४ वर)**

# तर मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी राजू शेट्टींचा इशारा

**पुणे :** शेतकऱ्यांना कर्जमाफीची आशा लागलेली असतानाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काही दिवसांपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी होईल की नाही? याबाबत स्पष्ट सांगितलं.शेतकऱ्यांनी आपआपले कर्ज भरण्याचे सूतोवाच अजित पवार यांनी केले. दरम्यान, यावरूनच आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी हे आक्रमक झाले आहेत. 'महायुती सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अन्यथा मंत्रिमंडळातील मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही', असा इशारा राजू शेट्टी यांनी दिला आहे. ते मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलत होते. महायुतीने शेतकऱ्यांचं कर्ज माफ करण्याचं आश्वान दिलं. पण आता अजित पवारांनी सांगितलं कर्जाचे पैसे भरा. या क्षणाला अनेक शेतकरी थकबाकीदार आहेत. त्या शेतकऱ्यांना बँकांनी नोटीस काढल्या आहेत. यावरून राज्यातील शेतकऱ्यांची आवस्था काय आहे हे लक्षात येतं. खरं तर लोकांनी शेतकऱ्यांचं दुहेरी नुकसान केलं आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती बँका देखील अडचणीत आलेल्या आहेत. आता कर्ज माफ झालं नाही म्हणून शेतकऱ्यांना एकीकडे जप्तीच्या **(पान ४ वर)**

# श्रीरामपुरात दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जण ठार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर-नेवासा रोडवर मंगळवारी विविध ठिकाणी झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातामध्ये तीन जण ठार झाल्याची घटना घडली. यामध्ये पतीपत्नी तर एका डॉक्टराचा समावेश आहे.

काल सकाळी अकरा वाजेच्या सुमारास नेवासा रोडवरील रेल्वे उड्डान पुलाजवळील कुटे हॉस्पीटल समोर दुधाचा टँकर (नं. एमएच १७ बीझेड १२२१) वरील चालकाने मोपेड ॲक्टीव्हा (नं. एमएच १७ सीजे ८५२४) गाडीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने मोपेड ॲक्टीव्हा गाडीवरील सुनिल थोरात व त्यांच्या पत्नी स्वाती थोरात यामध्ये जखमी झाले. घटना घडली तेव्हा घटनास्थळी नागरिकांनी एकच गर्दी केली होती. जमलेल्या नागरिकांनी तात्काळ मदतकार्य करत त्यांना शहरातील साखर कामगार हॉस्पीटलमध्ये दाखल केले, परंतू येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मयत घोषित केले.

यातील दुधाचा टँकर हा भरधाव वेगाने श्रीरामपूरकडे येत होता, या टँकर चालकाने ॲक्टीव्हा गाडीला जोराची धडक दिली. यामध्ये हा अपघात घडला. यामध्ये मोपेड ॲक्टीव्हा गाडीचाही चक्काचूर झाला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत सुनिल थोरात यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, भाऊ असा परिवार आहे. ते मुळचे राहाता तालुक्यातील एकरूखे येथील असून सध्या व्यावसायानिमित्ताने ते श्रीरामपूर येथे स्थायिक होते. येथील साखर कामगार हॉस्पीटल येथे शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर एकरूखे येथे त्यांच्यावर मोठ्या शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

तर दुसऱ्या घटनेत तालुक्यातील वडाळा महादेव येथील संजीवनी क्लिनिकचे डॉ. राजेंद्र सिताराम मैड (वय ४९) यांचा सोमवारी (दि. ३१) मार्च रात्री १० वाजेच्या दरम्यान रस्ता अपघातामध्ये ओकवुड वायनरी समोरील झाडाला आदळून मृत्यू झाला.

डॉ. राजेंद्र मैड हे काल सोमवारी (दि. ३१) मार्च रोजी क्लिनिक मधील रूग्ण तपासणी करूण घरी जात असताना नेवासा रस्त्यावरील ओकवुड वायनरी परिसरात अज्ञात व्यक्ती दुचाकीवर समोरून अंगावर येत होता. ते पाहुन डॉ. मैड यांनी आपली दुचाकी फिरवत झाडाच्या दिशेने वळवली. त्यामध्ये त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने डोक्यातून मोठा रक्तस्त्राव झाला. दुसऱ्याला वाचविण्याच्या प्रयत्नात स्वत:चा जीव गमावल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नागरीकांच्या माहितीवरून समोरचा दुचाकीस्वार नशेमध्ये असल्याने **(पान ४ वर)**

## आंबेजोगाईत दोघांकडून तरुणावर कोयत्याने वार

**बीड :** जिल्ह्यात गुन्ह्यांच्या घटना सातत्याने वाढतच असून आताही एका तरुणाला जीव गमवावा लागला आहे. अंबाजोगाईतील पोखरी रोडवर एका तरुणावर दोघा जणांनी कोयत्याने वार करून त्याची हत्या केल्याची घटना घडली. या हल्लयामध्ये जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. राजकुमार करडे असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेने अंबाजोगाईत एकच खळबळ उडाली आहे. पोखरी रोडवरील सारडा नगरी जवळ दोन तरुणांनी राजकुमार करडेवर धारदार शस्त्रांनी हल्ला केला. त्याच्या गळ्यावर, डोक्यात, पाठीवर सपासप वार करण्यात आले. या हल्लयात राजकुमार गंभीर जखमी झाला. त्याच्यावर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न करूनही अतिरक्तस्त्रावामुळे राजकुमारचा उपचार सुरु असताना मृत्यू झाला. दरम्यान, हा हल्ला कोणी केला आणि त्यामागचं कारण काय हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही. अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिकचा तपास पोलिस करत आहेत.

# लिव्ह इन मधील जोडप्याची आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** पैठण तालुक्यातील कातपूर गावात 'लिव्ह इन रिलेशनशिप' मध्ये राहणाऱ्या जोडप्याने विष घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

या संदर्भात माहिती अशी की ,पैठण एमआयडीसीच्या हद्दीत असलेल्या कातपूर गावातील अविवाहित नवनाथ शामराव जगधने व राहुलनगर येथील विवाहित शितल दोडवे (उघडे) या दोघांचे गेल्या अनेक वर्षांपासून प्रेम संबंध होते. दोघेही लव्ह इन रिलेशनमध्ये रहात होते.या दोन्ही प्रेमी युगलांनी औषध घेऊन आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

माहितीनुसार नवनाथ जगधने याने आपली प्रेमिका शितल हिच्या पहिल्या नवऱ्यापासून झालेल्या मुलाचा खून केला होता. याप्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. तर सबळ पुराव्याअभावी शितल हिची निर्दोष सुटका झाली होती. शिक्षा भोगत असलेला नवनाथ जगधने संचित रजेवर बाहेर आला होता. गेल्या पंधरा दिवसापासून शितल आणि नवनाथ यांनी विविध ठिकाणी जाऊन आनंद लुटला. संचित रजा संपल्यानंतर कातपूर शिवारातील एका मक्याच्या शेतात, २९ मार्च रोजी नवनाथला परत जाण्यापूर्वी दोघांनी टोकाचे पाऊल उचलत विषारी औषध घेऊन आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पैठण एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पथक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे, उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे, जमादार गणेश खंडागळे, या पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन घटनास्थळाचा पंचनामा केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संभाजी झिंजुर्डे करीत आहे.

# संतोष देशमुख हत्या प्रकरण : 'त्या' महिलेचाही झाला खून



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**धाराशिव :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाशी एका महिलेचे अनैतिक संबंध जोडले जात होते. आता त्याच महिलेचे हत्या प्रकरण समोर आले आहे. मनीषा बिडवे असे या महिलेचे नाव असून आरोपीने मनीषाला मारून तीन दिवस घरातच ठेवल्याचा प्रकार उघड झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी रामेश्वर भोसले हा मनीषा बिडवे हिच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करायचा. रामेश्वर भोसले याचे मनीषा हिच्याकडे काही आक्षेपार्ह फोटो होते आणि याच फोटोंच्या आधारे मृतक महिला त्याला ब्लॅकमेल करत असे. '५ लाख रुपये दे' अन्यथा बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी ही महिला देत होती. यामुळे संतापाच्या भरात आरोपी रामेश्वर याने मनीषाची हत्या केली. हत्या केल्यावर आरोपी हा मृतदेहाच्या शेजारी दोन दिवस झोपून होता. त्याच खोलीत तो जेवण सुद्धा करत होता. मात्र, तिसऱ्या दिवशी मृतदेहाचा उग्र वास येण्यास सुरुवात झाली. यानंतर आरोपी रामेश्वर हा घरातून बाहेर पडला आणि मृत महिलेची गाडी घेऊन आपल्या एका मित्राकडे पोहोचला. आपल्या केज येथील मित्राला रामेश्वर याने माहिती दिली. मग मृतदेह असलेल्या खोलीत गेला आणि पुरावे नष्ट करण्याचा दोघांनी प्रयत्न केला. मात्र, हा प्रयत्न अयशस्वी ठरला. मनीषा बिडवेची हत्या अनैतिक संबंध आणि पैशाच्या वादातून झाली आहे. हत्या प्रकरणातील दोन्ही आरोपींना अटक केल्यानंतर पोलिसांनी ही माहिती दिली. हत्येबाबत आरोपींनी कबुली दिल्याचे ही पोलिसांनी सांगितले. संतोष देशमुख हत्या प्रकरणात अनैतिक संबंध असल्याचं दाखवण्यासाठी महिलेचा वापर केला जात होता का ? यावर तपासाचा भाग असल्याच सांगत पोलिसांनी बोलण्यास नकार दिला.

### ■ अंजली दमानिया यांचा आरोप

हत्या झालेल्या महिलेचा बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुखांना अडकवण्यासाठी वापर करण्यात येणार होता, असा धक्कादायक आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. ही महिला ५ वेगवेगळ्या नावांनी वावरत होती, असा दावाही अंजली दमानिया यांनी केला आहे. मनीषा बिडवे, मनीषा गोंदवले या नावांनी महिलेचा वावर होता, असा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे. संतोष देशमुखांना अडकवण्यासाठी वाल्मिक कराड हे सर्व करणार होते. त्या बाईंना तयारही ठेवण्यात आले होते असा आरोप अंजली दमानिया यांनी केला.

# संपादकीय

## वारस आणि चर्चेतील नावे

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी काल गुढीपाडव्याच्या निमित्ताने नागपूरात होते. निमित्त होते माधव नेत्रायलयाच्या इमारतीच्या भूमीपूजनाचे. पंतप्रधान पदावर पोहोचलेला एक संघाचा स्वयंसेवक एका कार्यक्रमानिमित्त आपल्या मातृसंघटनेच्या मुख्यालयात गेला. ही घटना महत्त्वाची, असली तरी आश्चर्यकारक निश्चितपणे नाही. परंतु काही लोकांनी या भेटीला आश्चर्यकारक बनवण्याचा प्रयत्न मात्र केला. काहींनी त्याचा संबंध मोदींच्या चौथ्या टर्मशी जोडला. काही लोकांनी त्यांच्या निवृत्तीची चर्चा सुरू केली. संघ गेली शंभर वर्षे देशात काम करतोय. अनेक जण असे आहेत, ज्यांची हयात संघाला शिव्या देण्यात गेली. परंतु त्यांना संघ काय हे मात्र कळले नाही.
पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींची ही तिसरी टर्म. २०२९ नंतर ते पंतप्रधान राहतील का? त्यांना चौथी टर्म मिळेल का? असा प्रश्न अनेकांना पडतो आहे. काही लोक भाकीतांच्या माध्यमातून त्याची चाचपणी करण्याचा प्रयत्न करतायत. मोदींचा वारसदार महाराष्ट्रातून असेल आणि तो संघ ठरवेल, असे भाकीत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी केलेले आहे. राऊत हे बुडीत निघालेल्या एका पक्षाचे नेते, प्रवक्ते, खासदार आहेत. त्यांनी हा पक्ष बुडीत जाण्यापासून वाचेल कसा याची काळजी घेण्याचे सोडून ते जगातील सगळ्या विषयांची चर्चा आणि चिंता करीत असतात. केवळ पत्रकारांसमोर वावरणारे, मिरवणारे उद्धव ठाकरे आणि त्यांचे वारसदार हा त्यांच्या चिंतेचा खरा विषय असायला हवा. अगदी फारच चिंता प्रसवत असेल तर राष्ट्रवादी शपचा वारस कोण असेल किंवा राहुल गांधीनंतर काँग्रेसचा वारसा चालवण्यासाठी पक्ष शिल्लक राहील काय? याची चिंताही ते करू शकतील. परंतु हे करायचे सोडून ते विनाकारण भाजपाच्या फाटक्यात पाय घालण्याचा प्रयत्न करतायत. देशातील पक्ष म्हणजे काही कुटुंबांची मालकी असलेली राजकीय दुकाने आहेत. उबाठा शिवसेना ठाकरे प्रायव्हेट लिमिटेड, राष्ट्रवादी शरद पवार प्रायव्हेट लिमिटेड, काँग्रेस म्हणजे गांधी प्रायव्हेट लिमिटेड. तशी वेळ अद्यापि भाजपावर आलेली नाही. दिनदयाळ उपाध्याय यांच्यानंतर पक्षाची धुरा अटल बिहारी वाजपेयी यांनी समर्थपणे सांभाळली. अटलजींचे नेतृत्व ऐन भरात असताना लालकृष्ण आडवाणी यांनी पक्षाला नेतृत्व दिले. वाजपेयीनंतर कोण हा प्रश्न तर फार अवघड होता. नरेंद्र मोदी हा लोकांना आशेचा किरण वाटत होता. परंतु ते पंतप्रधान होतील, याचा विचार किती जणांनी केला होता? ते मोदी आजवरचे सर्वात यशस्वी पंतप्रधान ठरले आहेत. प्रत्येक नेता आधीच्या नेत्यापेक्षा चार पावले पुढे होता. संघ असो वा भाजपा दोन्ही ठिकाणी निर्णय प्रक्रिया सामुहिक असते. प्रत्येक यश-अपयशाबाबत चिंतन होते. त्यातून योग्य तो धडा घेऊन पुढची रणनीती ठरवली जाते. इतके मोठे संघटन आहे, अनेक दिग्गज नेते आहेत, तिथे वारसदार कोण या प्रश्नाचे उत्तर शोधणे फार कठीण नाही.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वय आज ७४ आहे. पंचहात्तरीनंतर निवृत्त व्हावे असा एक संकेत त्यांच्याच कारकीर्दीत भाजपामध्ये रुजला. मुरली मनोहर जोशी, लालकृष्ण आडवाणी हे नेते वानप्रस्थात गेले. त्यामुळे मोदी ७५ नंतर निवृत्त होतील काय, असा प्रश्न अनेकांना पडलाय. मोदींनी त्याचा विचार केला नसेल असे म्हणता येणार नाही. सत्तेचा अमरपट्टा घेऊन कोणीही जन्माला येत नाही, हे त्यांनाही माहिती आहे. संजय राऊतांनी मोदींच्या वारसदाराबाबत केलेले विधान म्हणजे देवेंद्र फडणवीसांच्या आरत्या ओवाळण्याचा प्रकार आहे. त्या ओवाळल्यानंतरही फडणवीसांनी राऊतांना ओवाळणी घातली नाही, ही बाब वेगळी. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी तुम्ही हो माता, पिता तुम्ही हो, तुम्ही हो बंधू सखा तुम्ही हो अशा आरत्या ओवाळण्याची रणनीती स्वीकारली आहे. राऊतांनी तिच लाईन घेतलेली आहे. मोदींचा वारस महाराष्ट्रातून असेल असे राऊत म्हणाले असतील तर त्यांना फडणवीसच अभिप्रेत आहेत, हे समजायला फार मोठी राजकीय समज असण्याची गरज नाही. महाराष्ट्र भाजपाकडे सध्या तरी दुसरे नाव नाही. फडणवीस यांनी २०२९ मध्ये मोदीच नेतृत्व करतील असे सांगत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कारण ते मुरलेले राजकारणी आहेत. ज्यांचे नाव चर्चेत असते ते यादीत कधीच नसते हे फडणवीसांना ठाऊक आहे. किंबहुना अनेकदा एखाद्यांचा पत्ता कापायचा असेल तर त्याच्या नावाची अधिकाधिक चर्चा करा, ही रणनीतीही नवी नाही. फडणवीस हे जाणून आहेत. सोव्हीएत रशियाचा नेता जोसेफ स्टॅलिन याची ती कथा फडणवीसांना माहित असावी. एकदा स्टॅलिनने पक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत सांगितले, की आता माझे वय झाले आहे. माझ्यानंतर पक्षाची जबाबदारी कोण सांभाळणार याचे उत्तर शोधण्याची वेळ आलेली आहे. सांगा माझ्यानंतर पक्षाची धुरा कोण सांभाळू शकेल ? ज्यांना स्टॅलिन माहिती होता, ते कोरा चेहरा करून बैठकीत बसून राहीले. नेतृत्वासाठी उतावीळ झालेल्या तीन जणांना हात वर केला. स्टॅलिननंतर पक्षाची जबाबदारी घेण्याची तयारी दाखवली. त्या दिवसानंतर ते तिघे पुन्हा कधीही दिसले नाहीत. मोदी हे स्टॅलिन नाहीत, भाजपामध्ये हुकूमशाही नाही. तरीही एक नेता यशस्वीपणे पक्ष आणि देश चालवत असताना त्याच्या वारसदाराची चर्चा होणे, त्याला रुचण्याची शक्यता कमी असते. भविष्यात काहीही होऊ शकते. मोदी ७५ नंतर पायउतार होऊ शकतात. जोपर्यंत देशाच्या जनतेची इच्छा आहे, तोपर्यंत ते नेतृत्व देऊ शकतात. जनतेची इच्छा मतपेटीतून व्यक्त होत असतेच. परंतु इथे भाजपाचे म्हणजे पर्यायाने देशाचे नेतृत्व निश्चित करणारा संघ नावाचा आणखी एक घटक सुद्धा आहे. हे मोदींनाही ठाऊक आहे. संघटन हे व्यक्तिच्या तुलनेत अधिक स्थायी आणि शाश्वत असते. त्यामुळे मोदींना असलेली वयाची मर्यादा संघाला नाही. संजय राऊतांना वारसदाराची बत्ती लावताना संघालाही गुळ लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे न समजण्या इतके संघाचे नेते दुधखूळे नाहीत. संजय राऊतांचा मुद्दा त्यांच्या सारखाच अदखल पात्र आहे. परंतु नेतृत्वाचा मुद्दा आज ना उद्या भाजपा आणि संघा समोर येणार ही बाब निश्चित आहे. वय ही मानवी मर्यादा आहे.

# फार्माथॉन संशोधन स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल : डॉ. डुबे

## अमृतवाहिनी कॉलेजमध्ये फार्माथॉन संशोधन परिषद उत्साहात



**संगमनेर :** अमृतवाहिनी कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील तिसऱ्या अमृत झाली. विद्यार्थ्यामध्ये पदवीपूर्व संशोधनाची उत्सुकता निर्माण करणे, पदव्युत्तर विद्यार्थाना संशोधन उपक्रमांसाठी प्रोत्साहित करणे या उद्देशाने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

परिषदेचे प्रमुख पाहुणे उद्योजक डॉ. रोहित डूबे (पुणे) यांनी औषधनिर्माण शास्त्रातील संशोधनाचे महत्व आणि व्यवसाय यशस्वीतेबद्दल मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख उपस्थित होत्या. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळेल आणि नवनवीन संशोधन जगासमोर मांडण्यासाठी अशा स्पर्धांची आवश्यकता आहे. असे मत त्यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. एम. जे. चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करून स्पर्धेचा उद्देश स्पष्ट केला. या परिषदेमध्ये औषधनिर्माणशास्त्र विभागात संशोधन करण्याबाबत विध्यार्थ्यामध्ये जागृती निर्माण झाली आहे. असे मत संस्थेचे अकॅडेमीक डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव यांनी व्यक्त केले. या संशोधन परिषदेत अहमदनगर, नाशिक, बुलढाणा, पुणे, शिरपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई सह महाराष्ट्रातील इतर शहरातील एकूण ३९० विद्यार्थी सहभागी झाले होते.

या परिषदेत पोस्टर प्रेजेंटेशन आणि ओरल अशा दोन फेरीतून स्पर्धा घेण्यात आली. या पोस्टर आणि ओरल स्पर्धेसाठी मूल्यांकन कर्त्यांना विविध बहुराष्ट्रीय फार्मा इंडस्ट्रीजचे वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ तसेच विविध फार्मसी संस्था आणि महाविद्यालयांतून तज्ञ प्राध्यापकांना आमंत्रित करण्यात आले होते. या परिषदेसाठी मूल्यमापन कर्ता म्हणून अमोल मोरे (नाशिक), गणेश म्हैसधुणे (सिन्नर) आणि अशोक कटकुरवार (नाशिक) यांनी संशोधनाचे मूल्यांकन केले.

या परिषदेमध्ये पदवी पातळीवर ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथील विद्यार्थी श्रेयस बरडे आणि सहकारी संशोधक विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. गोखले एज्युकेशन सोसायटीज् कॉलेज ऑफ फार्मसी, नाशिक येथील विद्यार्थी यश पडवळ आणि सहकारी संशोधक विद्यार्थ्यांनी दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. अमृतवाहिनी कॉलेज ऑफ फार्मसी, संगमनेरच्या श्रेयस वदक आणि सहकारी संशोधक विद्यार्थ्यांनी तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. मातोश्री इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, धानोरे, येवल्याची विद्यार्थीनी धनश्री जाधव, संजीवनी कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एजुकेशन अँड रिसर्च, कोपरगाव येथील विद्यार्थी सिद्धार्थ पवार तसेच ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथील विद्यार्थीनी प्राची लोंढे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

पदव्यूत्तर पातळीवर वाय. बी. चव्हाण, कॉलेज ऑफ फार्मसी, छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थीनी कोमल शिंदे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे येथील नेहा भंडारे यांनी दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. सेंट जॉन इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी अँड रिसर्च, पालघर येथील आरती पवार यांनी तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. पीएच डी पातळीवर राजश्री शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा येथील अजिंक्य पोटे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात व संस्थेचे विश्वस्त माजी आ.डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे आणि अकॅडेमीक डायरेक्टर डॉ.जे.बी.गुरव यांनी स्पर्धा यशस्वी झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

# कन्या विद्या मंदिरच्या ६७ विद्यार्थिनींचे संस्कृत स्पर्धा परीक्षेत यश



**लोणी:** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कन्या विद्या मंदिरच्या ६७ विद्यार्थिनींची राज्यस्तरी संस्कृत प्रतिभा शोध -परीक्षा २०२४-२५ कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक,नागपूर ,विस्तार सेवा मंडळ रवी कीर्ति संस्कृत अध्ययन केंद्र, सांगली यांनी घेतलेल्या संस्कृत प्रतिभा शोध परीक्षेत

शाळेच्या इयत्ता आठवी, नववी आणि दहावी, च्या एकूण ४६५ विद्यार्थिनींनी स्पर्धा परीक्षेत सहभाग घेतला होता त्यातील एकूण ६७ विद्यार्थिनींचा जिल्हास्तरीय स्पर्धा परीक्षेत भरघोस यश प्राप्त करून राज्यस्तरावर निवड झाली आहे. अशी माहीती प्राचार्या सौ.भारती कुमकर यांनी दिली.

प्रवरा कन्या विद्या मंदिर च्या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडावा यासाठी प्रयत्न केले जातात. इंग्रजी सोबतच मराठी ही ज्ञान देत असताना विद्यार्थिनींना संस्कृत विषयाचे देखील ज्ञान कन्या विद्या मंदिर च्या माध्यमातून दिले जाते. संस्कृत विषयात देखील प्रवरेच्या कन्या हे अव्वल स्थानावर राहिल्या आहेत.

# मुलींनी आपल्या माता-पित्यांशी मुक्त संवाद साधावा : सोळंकी

**बालाजी देडगाव :** मुलींनी आपल्या माता-पित्यांशी मुक्त संवाद साधून विश्वास निर्माण करावा, असे मत अर्चना सोळंकी यांनी व्यक्त केले. तक्षशिला ज्युनिअर कॉलेज व इंग्लिश मीडियम स्कूल देडगाव येथे मवयात येणाऱ्या मुलींना समजून घेतानाफ या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सोळंकी मार्गदर्शन करताना बोलत होत्या.

सोळंकी म्हणाल्या की, सोशलमीडियाच्या अतिरिक्त वापरामुळे कुटुंबातील संवाद नष्ट होत चालला आहे. त्यामुळे किशोरवयीन मुली स्वतः ला एकट्या समजत आहेत. त्यातून घर सोडून जाण्याचे प्रयत्न होताना दिसतात. त्यासाठी पालकांनी मुलींसोबत विश्वासाचे नाते निर्माण करून मुक्तपणे संवाद ठेवला पाहिजे. बेटी भाग मत जाना! असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले. अध्यक्षस्थानी तक्षशिलाच्या संचालिका शुभांगी कदम होत्या. कदम म्हणाल्या की, ही कार्यशाळा अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. किशोर वयात मुलींना त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये होणाऱ्या शारीरिक मानसिक व भावनिक बदलांना सामोरे जावे लागते. त्यामुळे त्या गोंधळून जातात. या वयात त्यांना भावनिक आधाराची गरज असते. पालकांनी मुलींशी मैत्रीचे नाते ठेवल्यास ही गरज पूर्ण होऊ शकते. प्रत्येक व्यक्तीने एखादा तरी छंद जोपासला पाहिजे. त्यामुळे कठीण काळातुन सावरण्याची ऊर्जा मिळते, कोरोना काळात आपल्याला याचा प्रत्यय आला.

कार्यशाळेमध्येआई व मुलगी यांच्यातील संबंध, मुलींचे शिक्षण आणि करिअर, गुड टच आणि बॅड टच, मुलींची आत्मनिर्भरता, मुलींचे शारीरिक आरोग्य व सामाजिक पर्यावरणातील बदल अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी मन्वंतर संस्थेचे अध्यक्ष प्रोफेसर डॉ. विजय कदम, तक्षशिला जुनिअर कॉलेज व इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य विठ्ठल कदम, उपप्राचार्य संदीप खाटीक, सर्व शिक्षक

# वैजापुरात रमजान ईद उत्साहात

**वैजापूर :** देशात शांतता, सुबत्ता, बंधुता नांदावी व नागरिकांना आरोग्य लाभावे अशी प्रार्थना ईश्वराकडे (अल्लाह) करत ईदगाह मैदानावर नमाज अदा करून रमजान ईद उत्साहात साजरी झाली. या प्रसंगी तालुक्याचे आमदार प्रा.रमेश बोरनारे, माजी सभापती बाबासाहेब जगताप, डॉ. दिनेश परदेशी, डॉ. राजीव डोंगरे, डॉ. निलेश भाटिया, शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे, प्रकाश चव्हाण, दशरथ बनकर, धोंडीरामसिंग राजपूत, विशाल संचेती, संजय बोरनारे, माजी नगरसेवक शैलेश चव्हाण, अॅड. प्रमोद जगताप, संजय निकम, दिनेश ढाकरे, मोहन साळुंके, तसेच जिल्हा (ग्रामीण) अतिरिक्त पोलीस प्रमुख अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसीलदार सुनील सावंत, पो.नि. श्यामसुंदर कौठाळे, गृह रक्षक अधिकारी नांगरे, ज्ञानेश्वर टेके, सचिन राऊत यांनी मुस्लिम बांधवाना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. सदर-ए -काझी हाफीजोद्दीन, माजी नगराध्यक्ष साबेरखान, मजीद कुरेशी, अकील शेख, कयुम सौदागर, अल्ताफ बाबा, अॅडय रियासतअली, अॅड. मझहर बेग, सलीम वैजापुरी, सज्जादअली, अहमद पठाण, रियाज पठाण, साबेर पठाण यावेळी उपस्थित होते. सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईदगाह मैदानावर जवळपास पाच ते सहा हजार मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केली.



# धर्माचे कार्य वैभवात करा : भास्करगिरी महाराज



**नेवासा :** श्रीराम जन्मोत्सव सोहळयानिमित्त तालुक्यातील मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत श्री सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथा व किर्तन महोत्सव सोहळयाला श्री क्षेत्र देवगड येथील श्री गुरूदेव दत्त पिठाचे महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांनी भेट देऊन दर्शन घेतले.

यावेळी बोलताना श्री भास्करगिरी म्हणाले की, धर्माचे काम वैभवामध्ये करा. परकीय शक्तीचे आक्रमण सत्काराच्या फॅशनच्या नावाखाली काही खाणे पिण्याच्या पदार्थातून होण्याची शक्यता असते. त्यासाठी प्रत्येक हिंदू रक्षकाने जागृत राहून धर्माचे काम वैभवात करावे. संस्कृतीचे अध:पतन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण सर्वांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. व्यसने ठासून करता येतात, मग धर्माचे काम ठासून का नको असेही त्यांनी उपदेशात सांगितले.

याप्रसंगी श्रीराम साधना आश्रमाचे महंत गुरुवर्य श्री सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते गुरुवर्य भास्करगिरी बाबांचे संत पूजन करण्यात आले. यावेळी मुकाई देवस्थानचे महंत गोपालानंदगिरीजी, संत सेवक बाळू महाराज कानडे,लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे,सुदामराव बनसोडे सुरेशराव उभेदळ, दत्तात्रय कागुणे, संजूबाबा गायकवाड, दशरथ मुंगसे, बीके पवार,युवा उद्योजक अमृत उभेदळ, सिताराम निपुंगे, पोपट निपुंगे, दादा बनकर, संदीप ताकपेरे, वैभव निकम, महेंद्र कानडे, प्रमोद निपुंगे, पत्रकार बाळासाहेब देवखिळे यांचे सह महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ .रेवन्नाथ पवार यांनी केले. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# एक हजार ५५० किलोमीटरच्या सायकल प्रवासाची कहाणी

## सचिन कुटे यांचा अनोखा उपक्रम, आयोध्या, प्रयागराज, काशी येथे घेतले दर्शन



**नेवासा :** एखादी गोष्ट मनावर घेतली तर काहीही अशक्य नाही. याचा प्रत्यय सचिन कुटे या तरुणाला आला आहे. या तरुणाने १४ दिवसांत तब्बल एक हजार ५५० किलोमीटरचा प्रवास चक्क सायकलने केला आहे. त्यांनी हा प्रवास करून नवा इतिहासच रचला आहे. त्यांच्या या अनोख्या प्रवासाचे त्यांच्या नातेनातेवाईक मित्र परिवाराकडून जोरदार कौतुक होत आहे. नेवासा बुद्रुकचे सचिन कुटे यांनी मनाशी खूणगाठ बांधत चौदा दिवसामध्ये हा प्रवास केला आहे. मेहनत, जिद्द आणि धाडस असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नसल्याचे ते म्हणाले. भामाठाम देवस्थानचे महंत रामायणाचार्य स्वामी अरुणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने मी ठरवलं की आपण सायकल प्रवास करायचा. तोही एकट्यानेच. दररोज शंभर किमीपेक्षा जास्त सायकल चालवली. प्रवासात अडचणी, वेदना सहन करत, प्रवास पूर्ण केला. कुटे यांचे उद्दिष्ट केवळ दर्शन नव्हते, तर ते एक विशेष संदेशही घेऊन आले आहेत. कुटे म्हणतात की, आजकाल लोक त्यांच्या व्यस्त दिनचर्येत आणि स्क्रीन टाइममध्ये इतके गुंतलेले आहेत की ते त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देऊ शकत नाहीत. त्यांना असे वाटते की लोकांनी त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून थोडा वेळ काढून व्यायाम करावा आणि शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहावे.प्रवासादरम्यान राजेंद्र कुरुंद, प्रकाश जोशी, कोलते सर, आई वडील व माझ्या पत्नी यांनी नित्य फोन करून माझे मनोबल वाढविले.नेवासा फाटा येथे आल्यावर कुटे यांचे फटाक्यांची आतिशबाजी करत स्वागत करण्यात आले. यावेळी गणेश वरखडे, सचिन गायकवाड, डॉ.मोहनराव कुटे, गणेश कुटे, रवींद्र कुटे, सखाराम शेळके, सचिन कुरुंद, हनुमान जाधव, राजेंद्र कुरुंद, आकाश भालेकर, प्रकाश जोशी, विनोद तेलतुंबडे, नितीन पाडळे, आत्माराम शिरसाठ, रितेश कराळे,निलेश गायकवाड,निलेश लवांडे, प्रवीण माकोने, अनिल परदेशी, अनिल शुळ, सचिन कुरुंद, अनिकेत मोकाटे, इम्रान अत्तार व इतर मित्र परिवार उपस्थित होता.

# होम मिनिस्टर कार्यक्रमात महिलांनी लुटला मनमुराद आनंद




**राहुरी :** देवळाली प्रवरा येथील सत्यजित कदम फाउंडेशनच्यावतीने जागतिक महिला दिनाचे आचित्य साधून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांना सन्मान माहेरचा पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात आला, तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

प्रीती कदम यांच्या पुढाकाराने जागतिक महिला दिनानिमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी देवळाली प्रवरा नगरपरिषद हद्दीतील महिलांना उपलब्ध करून दिली जाते. यंदाही गुढीपाडव्याच्या दिवशी राहुरी फॅक्टरीतील वृंदावन कॉलनी येथे सांगली येथील नितीन गवळी निर्मित होम मिनिस्टर कार्यक्रम पार पडला. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई अनंत पवार यांना प्रदान करण्यात येणारा सन्मान माहेरचा हा पुरस्कार अंजली भोसले व नंदा शिवतारे यांनी स्वीकारला. तेजस्विनी सूर्यवंशी, प्रियांका काळाने, अनुराधा मंडलिक, न्यायाधीश हर्षदा आदमाने, डॉ. गीतांजली बोरुडे, सरोजिनी फडतरे, डॉ. प्रीती मोरे यांना सन्मान माहेरचा तर चंद्रप्रभा जाधव, प्रिया जाधव, आरती जाधव, शोभा चोरडिया, अनुपमा चोरडिया, श्रद्धा चोरडिया, समाबाई टकले, अर्चना टकले, सोनाली टकले यांना मकै.प्रिया चंद्रशेखर कदम उत्कृष्ट सासू -सूनफ पुरस्काराने गौरविण्यात आले. राहुरी फॅक्टरी व देवळाली प्रवरा परिसरातील भजनी मंडळाचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी देवळाली प्रवरातील महिलांनी ढोल वादन करून सर्वांची वाहवा मिळविली. देवळालीतील भजनी मंडळाने टाळ मृदुंगाच्या गजरात विठुरायाच्या गीतावर नृत्याविष्कार करून उपस्थितांची मने जिंकली. किरण इघे व रोहिणी कराड यांनी उत्कृष्ट रॅम्प वॉक केला. लकी ड्रॉमध्ये अश्विनी इथापे, छाया खुरपे, मंजुषा सोनवणे या भाग्यवान विजेत्या ठरल्या.

यावेळी ज्योती ढुस, अनुजा महांकाळ, धनश्री कड, मंदाताई शेटे या होम मिनिस्टर कार्यक्रमात विजेत्या ठरल्या आहेत. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम, प्रीती कदम, अजित सूर्यवंशी आदिंसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उर्मिला शेटे, अनिता वीर, अनुजा कदम, मीना शेटे, अनुजा मुळे, साधना कदम, सुप्रिया शिंदे, अंजली अंबिलवादे, उमा कदम, स्वरूपा कदम, उज्वला कदम व सत्यजित कदम फाऊंडेशनच्या सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन जयश्री कोठुळे व गायत्री कदम यांनी केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# देवळाली प्रवरा केंद्रप्रमुखांवर शिस्तभंगाची कारवाई !

## विद्यार्थ्यांना जड वस्तू उचलण्यास सांगणे पडले महागात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राष्ट्रीय बाल हक्क व संरक्षण आयोग समिती (नवी दिल्ली) यांच्या चौकशीच्या फेऱ्यातून निसटण्यासाठी शाळेतील एका शिक्षिकेवर कारवाई होण्यासाठी केंद्रप्रमुखांनी खड्डा खोदला. परंतू त्याच खड्ड्यात केंद्रप्रमुख निलिमा गायकवाड स्वतःच पडल्या आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी गायकवाड यांच्या खुलाशातील हाच मुद्दा गृहित धरुन वरिष्ठांना त्या बाबतची कल्पना का दिली नाही, असा प्रश्न करुन येरेकर यांनी केंद्रप्रमुख निलिमा गायकवाड यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत, त्यांची तात्पुरत्या स्वरुपात एक वेतनवाढ रोखण्याचा आदेश बजावला आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कपाटासह इतर जड वस्तू उचलविण्यास भाग पाडणे निलिमा गायकवाड यांना चांगलेच महाग पडले आहे. दरम्यान, या प्रकाराबाबत राजेंद्र उंडे यांनी तक्रार केली होती. यावर जिल्हा परिषदेत सुनावणी झाली. यावेळी दोन्ही बाजूंनी खुलासा केल्यानंतर येरेकर यांनी केंद्रप्रमुख गायकवाड यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवला होता. देवळाली प्रवरा जि. प.शाळेत लोकसभा निवडणुकीवेळी अवजड साहित्यासह कपाटे हलविण्याचे काम सुरु होते. त्यावेळी काही विद्यार्थी अवजड कपाट वर्गातून बाहेर काढत असल्याचे छायाचित्र

> राष्ट्रीय बाल हक्क व संरक्षण आयोग समिती (नवी दिल्ली) यांच्याकडे राजेंद्र उंडे यांच्या तक्रारीनुसार केंद्रप्रमुख गायकवाड यांनी कामकाजात कसूर करुन, शिस्तभंग केल्याचा आदेश प्रशासनाने दिला आहे. या अनुषंगाने कारवाई करुन अहवाल सादर करणार आहे.
>
> **– मोहनीराज तुंभारे, गटशिक्षणाधिकारी, राहुरी.**

राजेंद्र उंडे यांनी सादर करुन, राष्ट्रीय बाल हक्क व संरक्षण आयोग समिती (नवी दिल्ली) यांच्याकडे तक्रार केली होती. या पार्श्वभूमीवर जि. प. प्रशासनाने गटशिक्षण अधिकाऱ्यांना या तक्रारीबाबत अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी केंद्रप्रमुख गायकवाड यांच्याकडे खुलासा मागितला होता. गायकवाड यांनी खुलासा देत नमूद केले होते की, तक्रारदार उंडे शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदावरून पाय-उतार झाल्याने त्यांनी वैफल्यग्रस्त होत तक्रार दिली आहे. जड वस्तू हलविण्यासाठी मजूर होते.त्यांच्यामार्फतच वस्तू हलविल्या. त्यांचे मजुरीचे अदा बील सादर केले आहे. कपाट हलविताना विद्यार्थी कुतूहलातून तेथे जमा झाले असताना त्यांचे छायाचित्र काढले होते. गायकवाड यांच्या खुलाश्यानुसार देवळाली प्रवरा येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपद हे २४ जुलै २०२३ पासून रिक्त होते. तसेच उपाध्यापक सुप्रिया आंबेकर या मुख्याध्यापकांशी उद्धटपणे वागतात, शासकीय कामात व्यत्यय आणणे असे वर्तन होते असे खुलाशात नमूद करुन त्या शिक्षिकेला गुंतविण्याचा प्रयत्न केला. गेला परंतु ती शिक्षिका उद्धटपणे वागत होती तर सदरची गायकवाड यांनी वरिष्ठांना अवगत करणे आवश्यक होते. परंतु सदरची बाब गायकवाड यांनी निर्दर्शनास आणलेली नाही. केंद्रप्रमुख पदाचे कर्तव्यात कसूर झाल्याची बाब निर्दशनास येत असल्याने त्यामुळे खुलासा अमान्य करणेत येत आहे. केंद्रप्रमुख पदाच्या कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला.

# शिर्डी विमानतळावर रात्रीच्या वाहतुकीस प्रारंभ

## हैदराबादहून आलेल्या प्रवाशांचे जल्लोशात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : श्री साईबाबा इंटरनॅशनल विमानतळावर बहुप्रतिक्षित मनाईट लँडिंगफ सेवेला अखेर प्रारंभ झाला आहे. महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर पहिल्या विमानाचे रात्रीच्या वेळी यशस्वीपणे लँडिंग करण्यात आले. या ऐतिहासिक घटनेमुळे शिर्डी आणि आसपासच्या भागातील विकासाला नवी गती मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.



गेल्या अनेक दिवसांपासून शिर्डी विमानतळावर रात्रीची विमानसेवा सुरू व्हावी, अशी मागणी भाविक आणि स्थानिक नागरिकांकडून होत होती. या मागणीची दखल घेत महायुती सरकारने याबाबत त्वरित निर्णय घेतला होता. अखेर गुढीपाडव्याला सरकारच्या या आश्वासनाची पूर्तता झाली आणि विमानतळावर पहिल्या रात्रीच्या विमानाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.याप्रसंगी मा खा. सुजय विखे पाटील उपस्थित होते. त्यांनी प्रवाशांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. नाशिकमध्ये कुंभमेळा होणार असल्यामुळे शिर्डी विमानतळ संपूर्ण विमान उद्योगाचे केंद्र बनेल, असा आमचा प्रयत्न आहे, असे विखे पाटील म्हणाले. तसेच, नवीन विमानतळ लवकरात लवकर पूर्ण करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. शिर्डी विमानतळ ५०० कोटी रुपये खर्चून बांधले जाणार असून ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे असेल. या विमानतळावर किमान चार ते पाच एरोब्रिजची सुविधा असेल. हे नवीन विमानतळ २०२७ पूर्वी पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे.औद्यगिक विकासात जिल्ह्याची होत असलेली प्रगती पाहाता विमानसेवेचा वाढता विस्तार महत्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.आगामी काळात कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या प्रवाशांना मोठा फायदा या सेवेचा होईल. अध्यात्मिक पर्यटनाकरिता शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळ देशातील प्रमुख विमानतळ ठरेल. यासंदर्भात पुढील आठवड्यात आम्ही मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेणार असून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे विमानतळ दोन वर्षांत पूर्ण करू, असा विश्वासही विखे पाटील यांनी व्यक्त केला.पहिल्या नाईट लँडिंगसाठी विमानतळावर खास तयारी करण्यात आली होती. विमान उतरल्यावर प्रशासन आणि स्थानिक नागरिकांनी जल्लोषात स्वागत केले. यावेळी विमानतळावर विशेष रोषणाई आणि सजावटही करण्यात आली होती. नाईट लँडिंग सेवेच्या प्रारंभामुळे शिर्डीला येणाऱ्या भाविकांची संख्या वाढेल आणि पर्यटनाला मोठा चालना मिळेल, असे विमानतळ प्रशासनाने सांगितले. यामुळे साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सोय होईल, असेही प्रशासनाने म्हटले आहे.

# डॉ. राजेंद्र मैड यांचे अपघाती निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**वडाळा महादेव** : महादेव येथील संजीवनी क्लिनिकचे डॉ राजेंद्र सीताराम मैड वय (४९) वर्षे यांचे अपघाती निधन झाले आहे. याबाबतची माहिती अशी की, डॉ. मैड रुग्ण तपासणी करून घरी जात असताना ओकवुड वायनरी परिसरात समोरुन दुचाकीवर येणाऱ्या अज्ञात व्यक्तीला वाचवण्याच्या प्रयत्नात त्यांचा गाडीवरील ताबा सुटल्याने त्यांची मोटारसायकल झाडावर आदळली. त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने डोक्यातून मोठा रक्तस्त्राव झाला. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरिकांनी अपघातामधील डॉ. मैड यांना ओळखत स्थानिक नागरिक यांच्या मदतीने वैद्यकीय उपचारासाठी श्रीरामपूर येथील कामगार हॉस्पिटलमध्ये दाखल केले. वैद्यकीय सूत्रांकडून उपचारापूर्वीच डॉ मैड यांना मयत घोषित करण्यात आले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी मुलगा, मुलगी, एक भाऊ असा शवविच्छेदनानंतर त्यांच्यावर नातेवाईकांच्या उपस्थितीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले, पोलिसांनी अपघाताची नोंद केली असून पुढील तपास श्रीरामपूरचे पोलिस करत आहेत.

द•ख•ल

## विखे कारखान्याच्या गाळप हंगामाची आज सांगता

प्रवरानगर : अमृत महोत्सवी वर्ष साजरा करीत असलेल्या पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ च्या ७५ व्या गळीत हंगामाची सांगता उद्या (बुधवार) दुपारी ३ वाजता कारखाना कार्यस्थळावरील डॉ. धनजंयराव गाडगीळ सभागृहात आयोजित कार्यक्रमाने होणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष कैलास तांबे यांनी दिली. जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या शुभहस्ते व माजीमंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या सांगता समारंभप्रसंगी प्रवरा मेडिकल ट्रस्टचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे पाटील, ट्रक सोसायटीचे अध्यक्ष जग्गनाथ राठी, कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, उपसभापती आण्णासाहेब कडू, प्रवरा फळे भाजीपाला सोसायटीच्या अध्यक्षा गिता थेटे, प्रवरा बँकेचे उपाध्यक्ष मच्छिंद्र थेटे, उपाध्यक्ष सुनिल जाधव यांच्यासह कारखान्याचे सर्व संचालक उपस्थितीत राहणार आहेत. सांगता समारंभास ऊस उत्पादक शेतकरी, सभासद आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संचालक मंडळाने केले आहे.

## परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांचा सन्मान



**नेवासा** : दैनिक राष्ट्र सह्याद्री परिवाराच्यावतीने नेवासा पोलीस स्टेशनचा पदभार घेतलेले परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांचा सन्मान करताना तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण. समवेत पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, शांतवन खंडागळे, वसंतराव डावखर, भारत गवळी आदी. (छाया : संतोष औताडे)

## शेळीपालनावर बाभळेश्वरला ८ एप्रिलपासून प्रशिक्षण

**लोणी** : कृषी विज्ञान केंद्र, बाभळेश्वर येथे ८ आणि ९ एप्रिलला बंधिस्त शेळीपालनावर ग्रामीण युवक-युवतींना आणि शेतक-यासांठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे प्रभारी प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी दिली. प्रशिक्षणाच शेळ्यांच्या जाती, शेळ्यांचे रोग व आजार व्यवस्थापन, मटणासाठी शेळीपालन, प्रकल्प आराखडा तयार करणे, मार्केटिंग, शेड उभारणी, बँकिंगच्या विविध योजना शासकिय योजना यांसारख्या विषयांवर तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुक आणि गरजूंनी प्रवेशासाठी केंद्राशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## निपाणी वडगावला उद्यापासून यात्रा उत्सव

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथील जागृत देवस्थान दावल मलिक बाबा व वीरभद्र महाराज यात्रा उत्सव निमित्त सालाबादप्रमाणे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे उद्या ( गुरुवार) सायंकाळी सात वाजता संदल मिरवणूक तसेच शुक्रवारी संध्याकाळी सात ते नऊ दरम्यान छबिना मिरवणूक होईल. रात्री लोकनाट्य तमाशा होईल. शनिवारी सकाळी साडेआठ वाजता हजेरीचा कार्यक्रम होणार असून दुपारी दोन ते सहा या वेळेमध्ये बैलगाडा शर्यत होईल. भाविकांनी दर्शनाचा व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन निपाणी वडगाव ग्रामस्थ तसेच दावल मलिक बाबा, वीरभद्र महाराज यात्रा उत्सव समिती यांच्यावतीने करण्यात आले आहे

# सुदर्शन पतसंस्थेला ५१ लाखांचा नफा : चव्हाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील सुदर्शन नागरी पतसंस्थेस सन २०२४/२५ आर्थिक वर्षात ५१ लाख रूपये निव्वळ नफा झाला असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष देवीदास चव्हाण व उपाध्यक्ष भूषण साठे यांनी संस्थेच्या बैठकीत बोलताना दिली.

आज उद्योग व्यवसायात निर्माण झालेली स्पर्धा अन् दुष्काळसदृश्य परिस्थितीत मंदावलेली बाजारपेठ यामुळे श्रीरामपूर शहर व तालुक्यात पतसंस्था सक्षम ठेवण्यासाठी सर्वांना तारेवरची कसरत करावी लागते. सुदर्शन पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे संस्थेच्या अधिकारी, कर्मचारी यांना वेळोवेळी मार्गदर्शन मिळते. संस्थेच्या पारदर्शी कारभारातून आलेख उंचावत असल्याने या आर्थिक वर्षात ५१ लाख रूपयाचा नफा मिळविण्याचे उद्दिष्ट पूर्ण करू शकलो, असे





सांगून चव्हाण म्हणाले की, संस्थेची ५ कोटी ६० लाख गुंतवणूक, ठेवी २० कोटी रूपये, कर्ज १५ कोटी ८४ लाख, तारण कर्ज ११ कोटी १० लाख, संस्थेची आर्थिक उलाढाल ८८ कोटी ५५ लाख, संमिश्र व्यवसाय १५ कोटी ८४ लाख रूपये, स्वनिधी २ कोटी ३३ लाख, मालमत्ता १ कोटी ८२ लाख, प्रती कर्मचारी व्यवसाय ७ कोटी १६ लाख असा आहे. व्यवसाय वाढिसाठी संस्थेने स्वमालकिच्या प्रशस्त नवीन जागेत स्थलांतर केले आहे. या नवीन इमारतीत ग्राहकांसाठी लॉकर सुविधा, सभासदांना दरवर्षी १३ टक्के लाभांश, संस्था दरवर्षी जागतिक महिला दिन, शैक्षणिक उपक्रमात उच्च पदावर निवड झालेल्या मुला-मुलींचा सन्मान, महापुरुषांच्या पुण्यातिथी-जयंती असे विविध सामाजिक उपक्रम संस्था राबवत असते. संस्थेच्या यशस्वी वाटचालीत संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पिग्मी एजंट, ठेवीदार, कर्जदार, सहाय्यक निबंधक, ऑडीटर वर्ग यांचे मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. बैठकीस भूषण साठे, रंगनाथ मैगदे, केशवराव औटी, प्रकाश धनवटे, सुजाता मालपाठक, डॉ. प्रविणा सातपुते, इंदुताई शिंदे यांच्यासह किशोर कुलकर्णी, सुहास याडकीकर संस्थेच्या व्यवस्थापक राखी शर्मा/ जोशी व कर्मचारी उपस्थित होते.

# पुणतांब्यातील शेतकरी फार्मर आयडीपासून वंचित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : राहाता तालुक्यातील ग्रामीण भागात सर्वात मोठया समजल्या जाणाऱ्या पुणतांबा गावात अजूनही अनेक शेतकरी फार्मर आयडी कार्डपासून वंचित आहेच. त्यामुळे शेतकरी कृषी विभाग व येथील तलाठी कार्यालयाच्या कारभारावर नाराज आहेत.

विशेष म्हणजे पुणतांबा येथे नोकरी करत असलेले कृषी विभाग व महसूल विभागाचे अधिकारी पुणतांबा येथे नोकरीच्या ठिकाणी वास्तव्यास नाही. ते कधी येतात व जातात याचा थांगपत्ता शेतकरीवर्गाला लागत नाही. कृषी विभाग व तलाठी विभागाकडे शेतकरी ओळखपत्र काढून घेण्यासाठी वारंवार हेलपाटे मारतात. सिस्टीम खराब आहे, तांत्रिक अडचण आहे अशी नेहमीची कारणे सांगून त्यांची बोळवण केली जाते. तीन दिवसापूर्वी पुणतांबा येथील कितीजणांचे फार्मवर आयडी काढणे अजून शिल्लक यांची यादीच एका ग्राहक सेवा केंद्र चालकाने समाज माध्यमावर टाकली होती. यादीनुसार अजूनही ७५० पेक्षा जास्त शेतकरी ओळखपत्र काढण्यापासून वंचित असल्याचे दिसून येते. शासकीय तसेच कृषी विभागाच्या अनेक योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच माहिती मिळविण्यासाठी शेतकऱ्याला ओळखपत्राची आवश्यकता आहे. मात्र अनेकांना र्मर आयडी मिळालेले नाही. येथील कृषी विभाग व तलाठी कार्यालय यांनी यासाठी स्वंतत्र शिबीर आयोजित करण्याची गरज आहे. कृषी विभागाने परिसरात एकाद्या शेतकऱ्याच्या फार्मवर कार्यक्रम घेतला, बैठका घेतल्या व प्रसिद्धीमाध्यमांना माहिती दिली म्हणजे त्यांचे काम पूर्ण झाले, असे नाही तर शेतकरीवर्गाच्या अडीअडचणी सोडविल्या पाहिजे, असे शेतकरीवर्गाचे मत आहे. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील किंवा आ. आशुतोष काळे यांनी एकादा जनता दरबार पुणतांबा येथे आयोजित करावा मग त्यांना पुणतांबेकरांचे प्रलंबित प्रश्न समजतील तसेच विविध विभागाचे अधिकारी ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबद टोलवा टोळवी करतात याचा प्रत्यय येईल, अशी भावना शेतकऱ्यांनी वर्गाने व्यक्त केली आहे.

# श्रीराम मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : श्रीरामनवमीनिमित्त येथील श्रीराम मंदिरात ज्ञानेश्वरी पारायणास ३० मार्चपासून सुरुवात झाली आहे. ६ एप्रिलपासून श्रीराम जन्मोत्सव व श्रीरामनवमीस प्रारंभ होत आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम मंदिरात सुरू झाले आहेत. कावले महाराज व्यासपीठ सांभाळत आहेत तर तुकाराम महाराज कदम हरिपाठ सेवा देत आहेत. काकडा भजनी मंडळ, मार्केट यार्ड भजनी मंडळ, दररोज संध्याकाळी ७ वा. श्रींची आरती केली जाते. गुरुवारी, श्रीराम मंदिर ट्रस्ट व श्रीराम यात्रा कमिटी यांच्या



(छाया : संजय पगारे)

हस्ते भजनी मंडळांचा सत्कार करण्यात येणार आहे. ८ एप्रिलला बेलापूर येथील हरिहर भजनी मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. भगवान महाराज मोरे (देहुकर) यांचे कीर्तन होणार आहे. मंदिर ट्रस्टचे अध्यक्षा प्रणिता गिरमे, सचिव दिनेश सूर्यवंशी, रोनक गिरमे, रमेश झिरंगे, वैशाली गिरमे, अशोक फोफळे, अमोल महाले, प्रतिक बोरावके यांच्या अध्यक्षतेखाली प्रभाकर अंभोरे, बाळासाहेब चव्हाण, सोमनाथ दहिकर, योगेश लाटणे, प्रदिप वाडेकर, दिनेश अंभोरे, कविता त्रिवेदी, चव्हाण हे सेवा नियोजन करीत आहेत.

# भक्तांचे सुख हीच शनीभक्ती : भास्करगिरी महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : श्रीक्षेत्र शनिशिंगणापुरात आल्यानंतर भक्तांना सुख समाधान मिळते. म्हणून दिवसेंदिवस भाविकांचा ओघ वाढत असल्याने देवस्थान जागतिक दर्जाचे बनले असून भक्तांचे सुख हीच शनीची भक्ती असे मत श्रीक्षेत्र दत्त देवगड संस्थानचे महंत गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांनी व्यक्त केले.

शनिशिंगणापूर येथे संत उदासी महाराज यांच्या ६९ व्या पुण्यतिथी निमित्ताने व ज्ञानेश्वर पारायणच्या दीप प्रज्वलनप्रसंगी भास्करगिरी महाराज बोलत होते. ते म्हणाले की, स्वर्गीय बाबुराव बनकर व तात्कलिन विश्वस्त यांनी छोट्याशा मंदिराचा जागतिक तीर्थक्षेत्र म्हणून नावलौकिक वाढवला. येथे असणाऱ्या भक्ती शक्ती, पानस तीर्थ, नवग्रह मंदिराच्या उपक्रमास साथ केल्याचे त्यांनी कौतु केले. शनिशिंगणापूरचे नाव जागतिक पातळीवर नेण्यासाठी पार्श्वगायिका अनुराधा पौडवाल यांच्या सूर्यपुत्र शनिदेव चित्रपट व शनि भक्तांची भजने गीतांचे ध्वनिफीत यांचा मोलाचा वाटा आहे. स्वर्गीय.बाबुराव बानकर व तात्कालीन विश्वस्त मंडळाने शनी मंदिराच्या विकासाची पायाभरणी करून ती अत्यंत विश्वासाने देवस्थानची प्रगती साधून देश पातळीवर नामोल्लेख केला म्हणून सर्व विश्वस्तानी आधी केले मग सांगितले अशी उपमा यावेळी त्यांनी दिली. भास्करगिरी महाराज यांचा सन्मान देवस्थानचे अध्यक्ष भागवत बनकर व उपाध्यक्ष विकास बानकर यांनी तर ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त विश्वासराव गडाख यांचा सन्मान माजी विश्वस्त प्राध्यापक शिवाजी दरंदले, माजी उपाध्यक्ष सोपानराव बानकर यांनी केला. देवस्थानचे सरचिटणीस आप्पासाहेब शेटे, विश्वस्त पोपटराव कुऱ्हाट, विठ्ठल आढाव, बाळासाहेब बोरुडे, पोलीस पाटील सयाराम बानकर, पंढरीनाथ शेटे, रावसाहेब शेटे, रंगनाथ शेटे, नितीन शेटे, आप्पा बोरुडे व भागवत दरदले उपस्थित होते.

# जगाला सन्मार्गाला लावण्यासाठी स्वामींचा अवतार : नांगरे महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नगर तालुक्यातील सांडवे येथे जेष्ठ पत्रकार अशोकराव सोनवणे यांनी स्थापित केलेल्या श्री स्वामी समर्थ मठामध्ये कीर्तन सोहळयाने पुष्पवृष्टी करून स्वामी समर्थ महाराजांचा प्रगटदिन साजरा करण्यात आला. दिनदुबळयांच्या व मुक्या जिवाच्या सेवेबरोबरच एकात्मतेचा संदेश देणाऱ्या स्वामींचा अवतार जगाला सन्मार्गाला लावण्यासाठी झाला असल्याचे प्रतिपादन नेवासा येथील युवा कीर्तनकार लक्ष्मण महाराज नांगरे यांनी केले.

नांगरे महाराज म्हणाले की, दिनदुबळयांसह मुक्या जिवाच्या विचार करणारे स्वामी समर्थ महाराज हे चालते बोलते तीर्थ असून मानव जातीच्या उद्धार करण्यासाठी स्वामी समर्थ महाराजांचा अवतार झाला आहे. त्यांच्या नुसत्या





**नेवासा** : नगर तालुक्यातील सांडवे येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकटदिनानिमित्त लक्ष्मण महाराज नांगरे यांचे कीर्तन झाले. समवेत भाविक. (छाया : सुधीर चव्हाण)

नामस्मरणाने जीवनातील संकटे दूर होतात.दया हे संतांचे मुख्य भांडवल असून त्याद्वारे संत हे जीवनाचा प्रवास करतात,ज्यांना माणसात माणूस दिसतो प्राणिमात्रांवर दया करतात तेच संतपदाला जाऊन पोहचतात,भूत दया जेथे तेथे संतांची भेट आपोआप घडते. चमत्कार हे नास्तिकांना नमस्कार करता यावा यासाठी असल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांना संपत्ती आहे पण त्यांच्यात दया नसेल इतरांच्या मुखात घालण्याची ऐपत नसेल त्या पैशाला किंमत नाही त्यामुळे जीवनात खरे वागा, असे आवाहन त्यांनी केले

स्वामी समर्थ महाराजांच्या सजविण्यात आलेल्या पालखीचे पूजन उपस्थित भाविकांच्या हस्ते करण्यात आले. स्वागत श्री स्वामी समर्थ मठाचे प्रमुख अशोकराव सोनवणे यांनी केले. आरती झाल्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सोहळयाला विष्णू महाराज राहुरीकर, अतुल महाराज पटारे, गणेश महाराज, रोहित सोनवणे, शोभा सोनवणे यांच्यासह भाविक उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

निशाणी नंबर : ०७ — **ॲड.जी.एम.निकम**, नेवासा कोर्ट, नेवासा

दिनांक : ०१/०४/२०२५

नेमलेली तारीख : ०९/०५/२०२५

नेवासा येथील मे. सिव्हिल जज्ज साहेब (ज्यु.डी) यांचे कोर्टात

वारस चौ.अ.नं. ४२/२०२५

**अर्जदार** – शेषराव आसाराम वासेकर, वगैरे

**सामनेवाले – कुणीही नाही**

**मयत** – गोविंद कुंडलीक ऊर्फ पुंडलीक वासेकर, मयत दिनांक २३/०४/२००५

वरील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मा. न्यायालयामध्ये मयतास अर्जदार हे वारस आहेत, म्हणुन वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. मयत गोविंद कुंडलीक ऊर्फ पुंडलीक वासेकर हे दि.२३/०४/२००५ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना वरीलप्रमाणे अर्जदार नं.१ ते ६ हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणुन अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वारस प्रमाणपत्र संबंधी कुणाचेही काहीएक म्हणणे किंवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासुन ३० दिवसाच्या आत मा. न्यायालयात स्वतः अगर वकीलामार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकुम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/०४/२०२५ रोजी माझी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी नोटीस दिली असे.

नेवासा. नेमलेली तारीख : ०९/०५/२०२५

**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, नेवासा**

शिक्का

**हुकूमावरुन**
**सह अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर नेवासा**

# कर्जत एमआयडीसीला शेतकऱ्यांचा विरोध

## खांडवी कोंभळी ग्रामस्थांकडून राजकीय नेत्यांना गावबंदी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील खांडवी कोंभळी परिसरामध्ये एमआयडीसी मंजूर झाली आहे. शेतकऱ्यांची संमती न घेताच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अंतर्गत कलम ३२ ( २ ) नुसार उपविभागीय अधिकारी यांच्या माध्यमातून नोटीस देण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर कोणतीही पूर्वकल्पना न देता एमआयडीसी साठी अधिग्रहण अशी उताऱ्यावर नोंद ही करण्यात आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. शेतकऱ्यांनी कोंबडी एमआयडीसीला कडाडून विरोध केला असून शेतजमीन बचाव कृती समितीने राजकीय नेत्यांना गावबंदीची घोषणा केली आहे.

एमआयडीसी ज्या लाभक्षेत्रामध्ये होणार आहे, त्या परिसरामध्ये शेतजमीन बचाव कृती समितीच्या नेतृत्वाखाली महिला, पुरुष शेतकरी एकत्र आले. यावेळी जोरदार घोषणाबाजी केली. यामध्ये आमच्या काळ्या आईचा सौदा आम्ही करू देणार नाही व बागायची शेतजमिनीच्या परिसरामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये एमआयडीसी होऊ देणार नाही. आम्हाला एमआयडीसी नको, अशा घोषणा दिल्या.

यावेळी महिला शेतकरी अधिक आक्रमक झाल्या होत्या. जर कुणी आमची शेत जमीन घेण्यासाठी पुढे आला तर सर्वप्रथम आम्ही आमच्या जीवाचे बलिदान देऊ, सर्व वृद्ध मंडळी घरातील लहान मुले यांच्यासह आत्महत्या करू, मात्र आमची शेत जमीन एमआयडीसी ला देणार नाही अशी भूमिका महिलांनी घेतली. या शेतजमिनी आम्ही आमच्या पोटच्या मुला बाळासारख्या सांभाळल्या आहेत. दुसऱ्यांच्या शेतामध्ये मोल मजुरी करून रोजंदारीने काम करून या शेत जमिनी घेतल्या आहेत, बँकांचे कर्ज काढले, त्याची कर्जाची रक्कम अद्याप आमची फिटलेली नाही, या सर्व जमिनी बागायती केल्या आहेत, फळबागा, शेततळे, विहिरी या परिसरामध्ये घेतल्या असून जर आमच्या जमिनी आपण एमआयडीसीसाठी अधिग्रहित केल्या तर आम्ही भूमी हिन होवू अशी भूमिका शेतकरी महिला व नागरिकांनी मांडली. प्रसंगी रस्त्यावर उतरू, रस्ता रोको आंदोलन करू, शासनाचे कार्यालय बंद पाडू . मात्र आमच्या जमीन आम्ही औद्योगीकरणासाठी देणार नाही असा इशारा यावेळी शेतकऱ्यांनी दिला आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी बोलताना आरोप केला की, या परिसरामध्ये एमआयडसी होणार नव्हती. थेरगाव परिसरामध्ये समितीने पाहणी देखील केली होती. असे असताना त्या ठिकाणचा परिसर वन विभागाच्या लगत असल्यामुळे औद्योगिकीकरणासाठी नाकारण्यात आला आहे. आमच्या परिसराचा काहीही संबंध नसताना, आमच्या परिसरामध्ये एमआयडीसी साठी शेत जमीन अधिग्रहण करण्यात आली आहे. वास्तविक पाहता आमच्या शेतजमीन घेण्या अगोदर ग्रामसभा घेऊन त्यांची मान्यता घेण्याची आवश्यकता होती ,गावामध्ये दवंडी देणे, ग्रामपंचायतीमध्ये नोटीस लावणे, स्थळ पाहणी करणे ,याची सर्व माहिती परिसरातील शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता असताना ,याबाबत कमालीची गुप्तता ठेवण्यात आली आणि थेट आमच्या सातबारा उताऱ्यावर शासनाने परस्पर नोंदी लावल्या आहेत. ही एक प्रकारे आमची फसवणूक केली आहे. यामुळे या पढील काळात ज्या नेत्यांचा एमआयडीसीला पाठिंबा आहे.

ते कोणीही आमदार, मंत्री, स्थानिक नेते यांना गावामध्ये प्रवेश करून येणार नाही. असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.यावेळी सुमन तापकीर, लता तापकीर, वैशाली तापकीर, शितल तापकीर, संगीता तापकीर, वंदना तापकीर, प्रमोद तापकीर, प्रदीप तापकीर, मिनीनाथ तापकीर, सुरेखा तापकीर, भारती गांगर्डे, मिरा तापकीर, निता तापकीर, सविता तापकीर, मनीषा तापकीर, अश्विनी तापकीर, राणी तापकीर, नंदा वायसे, अमित शेलार, भाऊसाहेब गोरखे,ऋषी गोरखे, पिन्टू उदमले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी महिला,पुरुष व युवक, नागरिक उपस्थित होते. यामुळे खांडवी कोंभळी एमआयडीसी देखील आता स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे अडचणीत सापडली आहे.

## निधन वार्ता..

### तात्याराम बनसोडे



**शिर्डी :** राहाता तालुक्यातील साकुरी येथील प्रगतीशील शेतकरी तात्याराम बाळाजी बनसोडे यांचे (वय ८०) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी , सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते सुधाकर बनसोडे यांचे वडील तर साकुरी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंचविमलबाईतात्यारामबनसोडेयांचेपतीहोते.

### बाबासाहेब लबडे



**श्रीरामपूर:** तालुक्यातील पढेगाव सोसायटीचे माजी चेअरमन व ग्रामपंचायतीचे माजी सदस्य बाबासाहेब रंगनाथ लबडे (वय ७२) वर्ष यांचे मंगळवार दि.१ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . त्यांच्या पश्चात सहा भाऊ, पत्नी,दोन मुले, दोन मुली, चुलतभाऊ सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे .श्रीरामपूर सूतगिरणीचे माजी चेअरमन स्व. रंगनाथ लबडे यांचे ते थोरले सुपुत्र तर डॉ. अप्पासाहेब व डॉ. रावसाहेब लबडे यांचे ते बंधू होत.

## ऋषभ हिरण एमबीबीएसमध्ये प्रथम



**श्रीरामपूर :** येथील व बेलापूर जैन समाजातील ऋषभ शांतीलाल हिरण हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथून एमबीबीएस परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

ऋषभ हिरण हे बेलापूर जैन श्रावक संघाचे कार्याध्यक्ष व किराणा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष शांतीलाल हिरण यांचे पुत्र आहेत. ते श्रीरामपूरचे जीवन मेडीकलचे मालक पंकज हिरण यांचे लहान बंधु आहेत. हिरण परिवारामध्ये ॲड. अशोक हिरण व सीए सुभाष हिरण यांनी जैन समाजात व हिरण परिवारात उच्च शिक्षण घेण्याचे रोपटे लावले होते.

## पान १ वरुन

### शासकीय कामकाजात वाढणार कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वापर

लावण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.राज्य पोलीस दलातील कृत्रिम बृद्धीमत्तेच्या वापरासाठी महाराष्ट्र रिसर्च अँण्ड व्हिजिलन्स फॉर एनहान्स्ड लॉ एन्फोर्समेंट लि. ही कंपनी २०२४ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. आता राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालये, तसेच विभागांनी कृत्रिम बृद्धिमत्ता तंत्रज्ञानाशी निगडीत विविध प्रकल्प राबवण्याचे नियोजन केले जात आहे. या प्रकल्पांमध्ये शासकीय माहिती गोपनीय व सुरक्षित रहावी यादृष्टीने मार्वल कंपनी मदत करणार आहे. त्यासाठी या कंपनीच्या कामाची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. कोणते प्रकल्प या कंपनीकडे द्यायाचे हे निर्णय घेण्यासाठी व ते मार्गी लावण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली तसेच संबंधित विभागांच्या सचिवांची शक्ती प्रदत्त समिती स्थापन करण्यास आज मान्यता देण्यात आली.

### आज वक्फ विधेयक

टीडीपीने विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचा निर्णय घेतला आहे. जेडीयूने केलेल्या सुचनाही सरकारने मान्य केल्याने दोन्ही पक्षांचे समर्थन मिळणार आहे.दरम्यान, वक्फ सुधारित विधेयक बुधवारी दुपारी १२ वाजता लोकसभेत सादर केले जाईल. या विधेयकावर जवळपास आठ तास चर्चा करण्यासाठी वेळ निश्चित करण्यात आल्याचे समजते. सुरूवातीला संयुक्त संसदीय समिती स्थापन करून विधेयकावर चर्चा झाली आहे. मात्र, विरोधकांची एकही सुचना मान्य करण्यात आलेली नाही. त्यामुळे बुधवारी लोकसभेतील कामकाजावर विरोधकांकडून बहिष्कार टाकला जाऊ शकतो. असे झाल्यास विधेयक मतदानाशिवाय मंजूर होऊ शकते. विरोधकांनी मतदान घेण्यास तयारी दाखवल्यास सरकार दोन्ही पक्षांचे समर्थन मिळाल्याने अडचण येणार नाही.

### तर मंत्र्यांना राज्यात फिरू देणार नाही

नोटीसा येत आहेत. दुसरीकडे वेळेत कर्ज न भरल्याप्रकरणी व्याज सवलत मिळत नाही. तसेच त्या शेतकऱ्यांचा समावेश थकबाकीदारांमध्ये होतो. तसेच शेतकऱ्यांनी ते कर्ज भरलं नाही म्हणून पुन्हा कर्ज मिळणार नाही. अशा पद्धतीची शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. मात्र, आम्ही हे सहन करणार नाहीत. येत्या एका आठवड्यात राज्य सरकारने याबाबतची भूमिका जाहीर करावी. अन्यथा महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या तीनही पक्षाच्या मंत्र्यांना आम्ही राज्यात फिरू देणार नाही, असे राजू शेट्टी यांनी म्हटले आहे.

### सहकार महर्षी थोरात कारखान्याची ११ मे रोजी निवडणूक

तर तहसीलदार धीरज मांजरे यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याची प्रारूप मतदार यादी २५ फेब्रुवारी व अंतिम मतदार यादी १९ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, असे निवडणूक अधिसूचनेद्वारे कळविण्यात आले आहे.

### श्रीरामपुरात दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जण ठार

त्याची दुचाकी रस्त्याच्या कडेला पडलेली आढळून आली. यामध्ये डॉ. मैड यांच्या डोक्याला मोठी इजा झाली. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक नागरीकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत डॉ. मैड यांना वैद्यकीय उपचारासाठी रुग्णवाहिकेतून येथील कामगार हॉस्पिटल या ठिकाणी हलविले. या अपघाताची माहिती शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली. त्यावरून पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे यांनी भेट देत डॉ. राजेंद्र मैड यांच्या वडिलांची तसेच माजी सरपंच अविनाश पवार, अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक रामभाऊ कसार, उत्तमराव पवार व नागरीकांची भेट घेतली. याप्रसंगी स्थानिक नागरीकांच्या माहितीवरून डॉ. मैड यांचे दुचाकी वाहन जोरात असल्याने तसेच दुसरे दुचाकी वाहन आडवे आल्याने गाडीवरील ताबा सुटल्याने झाडाला आढळून डोक्याला जबर मार लागला. प्राथमिक तपासणी करून साखर कामगार येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी उपचारापूर्वीच डॉ. मैड यांना मयत असल्याचे घोषित केले.यावेळी वडाळा महादेव येथील ग्रामस्थ तसेच शिरसगाव, आशिर्वाद नगर परिसरातील नातेवाईक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या मागे वडील, पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, असा मोठा परिवार आहे. शवविच्छेदनानंतर काल मंगळवारी वडाळा महादेव येथे त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याबाबत पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

## कायम सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत घेण्यासाठी धरणे आंदोलन




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** नगरपालिकेतील आरोग्य विभागातील आस्थापनेवरील कायम रिक्त पदावरील सफाई कामगारांच्या वारसाना लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सेवेत कायम करावे या मागणीसाठी अ.नगर जिल्हा नगरपालिका कामगार कर्मचारी युनियनच्या वतीने कॉ. जीवन सुरुडे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेसमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु करण्यात आलेले आहे. श्रीरामपूर नगरपालिकेत कोर्ट आदेशाने सुमारे १८२ पेक्षा जास्त कर्मचारी हे विविध विभागात सन १९८८ साली कायम करण्यात आलेले होते. त्यापैकी ७३ कर्मचारी हे कायम सफाई कर्मचारी होते.

सदर सफाई कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर मुदतीत अर्ज करुनही त्यांच्या वारसांना तातडीने वारसाहक्काने नियुक्ती देणे आवश्यक असतानाही त्यांना नियुक्ती न देता त्यांच्यावर अन्याय करण्यात आलेला आहे. लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना सेवेत घेण्याची पध्दत गेली अनेक वर्ष सुरु आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अमंलबजावणीबाबत दि. २४ फेब्रु. २०२३ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. तसेच सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी ही दि. ८ जानेवारी २०२५ रोजी या शासन निर्णयाची तातडीने काटेकोर अमंलबजावणी करण्याचे निर्देश देखील दिलेले आहेत. तरीही श्रीरामपूर पालिका प्रशासनाकडून या कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत टाळाटाळ करण्यात येत आहे.

या निषेधार्थ कायम झालेल्या सफाई कर्मचा-यांच्या वारसांना सेवेत घेणेकरिता सदरचे धरणे आंदोलन करण्यात आलेले आहे.

या आंदोलनाला करण ससाने, बाबासाहेब दिघे, माजी नगरसेवक राजेश अलघ, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, बाबासाहेब शिंदे, सुधीर वायखिंडे, अभिजीत लिपटे, के. सी. शेळके, संजय छल्लारे, सुहास राठोड, विजूभाऊ पवार, जोयब जमादार, तिलक डूगरवार, कामगार नेते नागेश सावंत, प्रसाद चव्हाण, जितेंद्र चव्हाण, संदीप मगर, गोरे यांनी पाठिंबा दिला. आंदोलनात नंदाताई गायकवाड , विजय शेळके,सूर्यभान सातदिवे, दीपक शेळके, संतोष केदारे, सुभान पटेल, शंकर शेळके ,जीवन बोकफोडे, किशोर पापा झिंगारे, नितीन जाधव, रामलाल चाबुकस्वार, भाऊसाहेब विधाटे, नंदा गायकवाड , पुष्पा बोरकर, सखुबाई काकफळे, ज्योती पवार, चंदा रूपवते, दिपाली चव्हाण, संगीता कोल्हे, विठाबाई आडागळे, वंदना साठे व कामगार सहभागी झाले होते.

## श्री रोकडोबा महाराज व मासूम बाबा यात्रोउत्सव कमिटीची कार्यकरणी जाहीर







**चितळी :** जळगाव (ता.राहाता) पंचक्रोशीचे ग्रामदैवत रोकडोबा महाराज व मासूम बाबा यात्राउत्सव सालाबादाप्रमाणे श्रीराम नवमीच्या पार्श्वभूमीवर (दि.४) ते (दि.६) एप्रिल या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे यापार्श्वभूमीवर गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर जळगावातील समस्त ग्रामस्थांच्या उपस्थितीत यात्राउत्सव कमिटीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी जळगाव पंचक्रोशीचे मार्गदर्शक तथा ज्येष्ठ नेते गंगाधर चौधरी,अण्णासाहेब चौधरी,गणेशचे संचालक भाऊसाहेब चौधरी,गणेशचे संचालक संपतराव चौधरी,आदीसह पंचक्रोशीतील थोर-ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली रोकडोबा महाराज यात्राउत्सव कमिटीच्या नूतन कार्यकरणीची निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. आगामी यात्रा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ग्रामदैवत रोकडोबा मंदिरात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी यात्राउत्सव कमिटी अध्यक्षपदी उपसरपंच दिलीपराव चौधरी उपाध्यक्षपदी माजी तंटामुक्ती अध्यक्ष तथा युवा उद्योजक महेंद्र चौधरी तर खजिनदारपदी विजय भा.चौधरी यांची सर्वानुमते निवड झाली.

## परमेश्वर पीडितांवर दया करतो




मी स्वतःहून काहीही करू शकत नाही; मी ऐकतो तसे मी न्याय करतो आणि माझा न्याय न्याय्य आहे, कारण मी स्वतःची इच्छा नाही तर ज्याने मला पाठवले त्याची इच्छा शोधतो. (योहान ३:२०)

अनेकदा असे काही आढळते जे माझ्यासमोर नाही यावर विश्वास ठेवणे कठीण जाते. त्रास, दुःख पाहणे सोपे आहे: फक्त बातम्या चालू करा आणि तुम्हाला वाटेल की आपण दररोज एकमेकांशी युद्ध करत आहोत.

योहानाच्या शुभवर्तमानातील उताऱ्यात आपल्या तारणासाठी येशू वधस्तंभावर त्याच्या मोठ्या वेदनांमध्ये होता तेव्हा: जेव्हा येशूने त्याची आई आणि ज्या शिष्यावर तो प्रेम करत होता त्याला पाहिले, तेव्हा तो त्याच्या आईला म्हणाला, ''बाई, पाहा, तुझा मुलगा.'' मग तो शिष्याला म्हणाला, ''पाहा, तुझी आई.''आणि त्या क्षणापासून शिष्याने तिला आपल्या घरी नेले.

आपल्याला येथे इतरांची काळजी घेण्याची आज्ञा देण्यात आली होती आणि जेव्हा असे होते तेव्हा मला संघर्षाचा थोडासा भाग कमी झालेला आढळला आहे, जो मी माझ्या समोर पाहू शकतो. एक म्हण आहे की जेव्हा वेदना वाटली जाते तेव्हा ती वाटली जाते, जेव्हा आनंद वाटला जातो तेव्हा ती वाढते.

गुड फ्रायडेच्या दिवशी आपण वधस्तंभाकडे प्रवास करत असताना, आपण देवाकडे मदत मागण्यासाठी आणि मागण्यासाठी कृपेसाठी प्रार्थना करूया आणि आपले अवलंबित्व जाहीर करण्यासाठी कृपेसाठी प्रार्थना करूया.

दररोज येणाऱ्या दोन परस्परविरोधी आवाजांवर विचार करा. एकाला येशूच्या आज्ञेच्या सामर्थ्याने फटकारले पाहिजे आणि दुसऱ्याला दररोज खोलवर स्वीकारले पाहिजे. देवाची उपासना करणे म्हणजे पूर्णत्व आहे. तुम्ही ज्यासाठी निर्माण केले आहात तेच यासाठी आहे. उपासना तुम्हाला देव तुम्हाला ज्या व्यक्तीमध्ये बदलू इच्छितो त्या व्यक्तीमध्ये रूपांतरित करेल. ती तुम्हाला देवाच्या जीवनात सहभागी करून घेईल आणि शेवटी पतित देवदूतांच्या फसवणुकीपासून पूर्ण संरक्षण मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे, जेणेकरून तुम्ही देवाच्या तेजस्वी वैभवात सहभागी व्हाल.



– रेव्ह. फा. **प्रकाश भालेराव**
(प्रमुख धर्मगुरु लोयोला सदन चर्च, **श्रीरामपूर**),
९४२३०२९४०६

## पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिर कामाचे उद्घाटन



**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथील श्री म्हाळसा खंडोबा बाणाई या पुरातन मंदिराच्या सभामंडप बाजूस बसविण्यात आलेल्या नवीन ग्रील कामाचे उदघाटन गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संभाजी ठाणगे,बालू फसले,राजेंद्र काशीद,शांताराम बोर्डे,संजय कुटे,गणेश मंडलिक,प्रकाश उंडे,राजेंद्र थावरे,बाबासाहेब डोहळे,नितीन शास्त्री यांच्या हस्ते उद्धव महाराज मंडलिक यांचे संतपूजन करण्यात आले. यावेळी म्हाळसा खंडोबा बाणाई पुरातन मंदिर सभामंडपामध्ये सुशोभीकरण ग्रील काम करणारे कारागीर मार्कस बोर्डे,सनी बोर्डे,सूरज बोर्डे यांचा उद्धवजी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि. ०२ एप्रिल २०२५**

| मिलनम डे | | |
| --- | --- | --- |
| उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत | |
| १४० १५८ १२२ | ५-६ | १५० १६९ ११४ |
| जोड | ५२-९६-४७-८१-६० | |

| कल्याण | | |
| --- | --- | --- |
| उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत | |
| १३० २४८ ६८० | ४-९ | १२६ १८० ११७ |
| जोड | ४१-७९-२० ६८-९५ | |

| मुंबैम (मेन) | | |
| --- | --- | --- |
| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत | |
| १२० २३८ ३३७ | ३-० | १९० २८० ४६० |
| जोड | ३२-७०-६१ ३८-०४ | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 06/01/2025 to 11/01/2025 | 388 91 100 | 178 69 135 | 358 60 127 | 449 71 128 | 350 85 267 | 390 20 370 |
| 13/01/2025 to 18/01/2025 | 180 95 357 | 138 28 279 | 236 11 588 | 679 29 270 | 390 28 350 | 470 18 189 |
| 17/02/2025 to 22/02/2025 | 255 21 137 | 470 19 900 | 247 33 788 | 399 17 179 | 269 76 556 | 224 84 455 |
| 24/02/2025 to 01/03/2025 | 447 57 269 | 367 65 267 | 136 06 457 | 180 97 179 | 270 93 337 | 690 53 120 |
| 02/03/2025 to 08/03/2025 | 778 21 588 | 460 01 669 | 558 80 677 | 300 39 289 | 129 20 460 | 370 01 |
| 10/03/2025 to 15/03/2025 | 789 49 568 | 125 89 469 | 369 83 157 | 156 29 180 | *** ** *** | 130 44 128 |
| 16/03/2025 to 22/03/2025 | 588 82 778 | 244 01 290 | 579 14 347 | 120 33 788 | 160 70 677 | 588 13 670 |
| 23/03/2025 to 29/03/2025 | 111 33 139 | 677 00 334 | 470 10 347 | 890 79 289 | 257 41 155 | 234 96 556 |
| 23/03/2025 to 29/03/2025 | 128 12 336 | | | | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द • ख • ल

# बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिंगवे पारगाव** मौजे थोरदांळे येथील फुटाणेमळा या ठिकाणी वनविभागांने लावलेल्या पिंजऱ्यात साधारण पाच ते सहा वर्षांचा नर जातीचा बिबट्या रात्रीच्या बाराच्या सुमारास जेरबंद झाला.दोन दिवसांपूर्वी या परिसरात एका कामगारांवर बिबट्याने हल्ला केल्याची घटना या परीसरात घडली होती. या घटनेची दखल घेत वनपरिक्षेत्र अधिकारी मंचर विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाने ताबडतोब घटनास्थळी पिंजरा लावला होता.आज मध्यरात्री नर जातीचा बिबट्या जेरबंद झाला असल्याची माहिती स्थानिक लोकांनी वनमजूर महेश टेमगिरे यांना दिली.वनमजूर महेश टेमगिरे यांनी घटनेची माहिती वनपाल प्रदिप कासारे यांना दिली. ।घटनेची माहिती मिळताच सदर घटनास्थळी ताबडतोब वनपाल प्रदिप कासारे,ऋषिकेश कोकणे,बिबट कृतीदल गावडेवाडी मनोज तळेकर,चारूदत्त बांबळे,कुणाल गावडे,हर्षल चौधरी यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला पहाटे अडीचच्या सुमारास ताब्यात घेतले.सदर घटनास्थळी थोरदांळे गावचे उपसरपंच संदिप टेमगिरे तसेच ग्रामस्थांनी उपस्थित राहून वनविभागाला मदत केली. वनविभागांने हल्ला करणारा बिबट्याला जेरबंद केल्याने वनविभागाचे आभार मानले.



# बारामतीत ११ ते १३ एप्रिल दरम्यान धान्य महोत्सव


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** अ‍ॅग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट संचलित कृषी विज्ञान केंद्र बारामती आणि शारदा महिला संघ यांच्या मार्फत महावीर भवन, तीनहत्ती चौक, कॅनोल रोड येथे ११ ते १३ एप्रिल दरम्यान धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यावर्षीचा हा दहावा धान्य महोत्सव आहे. घरगुती वापरासाठी वर्षभर लागणारे गहू, तांदूळ, ज्वारी, कडधान्य, डाळी, बाजरी, काजू, बदाम, हळद, मशरूम, भरड धान्य व त्याचे प्रक्रिया पदार्थ, दुधाचे प्रक्रिया पदार्थ इत्यादी शेतातून थेट आपल्यापर्यंत शेतकऱ्यांकडून खरेदीची सुवर्णसंधी या महोत्सवात नागरिकांना मिळते व त्याला प्रतिसाद देखील उत्तम असतो या दरम्यान सकाळी ९ ते रात्री ८;३० या वेळेपर्यंत हा महोत्सव खुला राहणार आहे. हा धान्य महोत्सव संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार व विश्वस्त सौ.सुनंदाताई पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. निलेश नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

# आठ वर्षीय अनमने केला पहिला रोजा पूर्ण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गंगापूर शहरातील आठ वर्षीय अनम अजहर शेख या चिमुकलीने आपल्या जिवनातील पहीला रोजा उपवास पुर्ण केला असुन अनम अजहर शेख चिमुकलीने पहीला रोजा उपवास पुर्ण केल्याबद्दल वडील अझहर शेख,काका मुसा शेख अजोबा कदीर शेख , चुलते मुन्ना शेख,अयाज खान,अजीम मनीयार आदींनी अभिनंदन केले आहे.



# पाण्याची पाईपलाईन निकृष्ठ दर्जाची अधिकाऱ्यावर कारवाई करा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** शेवगाव शहरातील नगर परिषदेच्या माध्यमातून खरडगाव रोड पाणी टाकी ते ढाकणे वस्ती, गावडे - वाकडे वस्ती, गहिले वस्ती ते जहागीरदार वस्ती अशी ३२ लाख रकमेची पाण्याची पाईपलाईन करण्यात आलेली होती॥ परंतु संबंधित ठेकेदाराने हे काम पूर्ण केले नाही व हे काम अत्यंत बोगसरीत्या झाले. पाण्याची पाईपलाईन निकृष्ठ दर्जाची अधिकार्यावर कारवाई कराअशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ निरज लांडे पाटील यांनी तहसिलदार प्रशांत सांगळे यांच्याकडे केली आहे. बऱ्याच ठिकाणी याचे पाईपही पडले नाहीत त्यामुळे असे चुकीचे काम करणाऱ्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करावे व काम सुचविणारा अधिकाऱ्यांवर कारवाई करून ठेकेदाराचे शेवगाव नगरपालिका हद्दीत सुरू असलेले सर्व कामे त्वरित थांबवावीत जेणेकरून भविष्यात पुढील कामे बोगस होणार नाहीत. यासाठी तहसिलदार या ठेकेदार व अधिकार्यावर कारवाई करणार का? शेवगाव शहरातील नागरिकांकडून दोन टक्के व्याजाने पैसे वसूल केले जातात का? असाच प्रश्न डॉ. निरज लांडे पाटील यांनी केला यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# रमजान ईद उत्सव उत्साहात साजरा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे मुस्लिम बांधवांच्या वतीने पवित्र रमजान ईद उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गणेश खिंड रोड इदगा मैदान या ठिकाणी मुस्लिम बांधवांची रमजान ईद सणानिमित्त प्रार्थना पार पडली. यावेळी समाजाचे ऐक्य राहून सलोखा वाढावा अशी मुस्लिम बांधवांनी प्रार्थना केली. यावेळी गावातील मान्यवर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूर पटारे, माजी उपसरपंच भारत भवार, विलास दाभाडे,अर्जुन राऊत, ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे, मोहन रणवरे आदींनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना रमजान ईद सणानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी टाकळीभान येथील समस्त मुस्लिम बांधव उपस्थित होते.



## सोशल मिडीयाचा गैरवापर करताय ! मग सावधान

# इन्स्टाग्रामवर अश्लिल मजकूर टाकणाऱ्यास अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर** - आजचे आधुनिक इंटरनेटचे युगात फेसबुक, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट इ. सारखे अनेक समाजमाध्यम (सोशलमिडीया) प्लॅटफॉर्म उपलब्ध असुन त्यातुन एक स्वतंत्र आभासी दुनिया निर्माण झालेली आहे, अनेक तरुण- तरुणी या आभासी दुनियेत वावरत असताना मनाला वाटेल तसा समाजमाध्यमांचा गैरवापर करीत असलेबाबत अनेक प्रकार घडत आहेत. माळेगाव पोलीस ठाणे कार्यक्षेत्र अंतर्गत एका गावात वास्तव्यास असणाऱ्या व इ. ०९ वी. मध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन शालेय मुलीच्या फोटो वापरुन त्या फोटोवर तीचे चारीत्र्याविषयी बदनामी होईल, असे जाणीवपुर्वक अश्लिल स्वरुपाचे मजकुर लिहुन त्याची इन्स्टाग्राम या समाजमाध्यमावर खाते (अकांऊंट) तयार करुन त्यावर स्टोरी ठेवलेचा प्रकार संबंधित शालेय विदयार्थिनीचे वडीलांना व कुटुंबियांना माहीती मिळाल्यानंतर पिडीत शालेय विदयार्थिनीचे वडीलांनी घडले प्रकाराबाबत माळेगाव पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदवल्याने त्या अनुषंगाने माळेगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होवुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, बारामती तालुका पोलीस ठाणे यांचेकडे दिलेला होता. सदर गुन्ह्यात फिर्यादी यांनी नमुद केलेल्या तक्रारीचा आशय व वस्तुस्थिति ही गंभीर स्वरुपाची असलेने तसेच काहीएक कारण नसताना एका अनोळखी इसमाने समाजमाध्यमाचा गैरवापर करुन बदनामी होईल, अशी कृती केलेने पिडीत मुलीसह संपुर्ण कुटुंबातील सदस्यांचे सामाजिक आयुष्यावर गंभीर परीणाम होण्याची शक्यता निर्माण झालेने सदर गुन्हयाचे गांभीर्य ओळखुन सदरचा गुन्हा उघडकीस आणणेचे दृष्टीकोनातुन अज्ञात आरोपीचा शोध घेणेकरीता तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्रीमती वैशाली पाटील यांनी माळेगाव पोलीस ठाणे स्तरावर तपास पथक तयार करुन त्यांना सदर गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशित केलेले होते. सदर आदेशाचे अनुषंगाने सदर गुन्हयात वापरले इन्स्टाग्राम खाते (अकांऊंट) व त्याचा वापर करणारे



अज्ञात आरोपीची माहीती शोधणेकरीता माळेगाव पोलीस ठाणे कडील स.पो.नि. श्री. सचिन लोखंडे यांचे सुचनेनुसार पोलीस नाईक श्री. ज्ञानेश्वर सानप यांनी इन्स्टाग्राम व फेसबुक या समाजमाध्यम चालविणाऱ्या मेटा प्लॅटफॉर्म या अमेरिकास्थित जागतिक कंपनीच्या कार्यालयाकडे संबंधित इन्स्टाग्राम खातेची माहीती मिळणेकरीता पत्रव्यवहार करुन त्यांचेकडुन माहीती प्राप्त करुन घेवुन त्या माहीतीचे तांत्रिक विश्लेषणाचे आधारे सदरचा गुन्हा हा पवन राजेंद्र क्षिरसागर (वय २१ वर्ष, रा. ढाकाळे ता. बारामती जि.पुणे) याने केला असलेबाबत खात्रीशीर माहीती मिळाली. त्यानंतर सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पवन राजेंद्र क्षिरसागर यांस माळेगाव पोलीसांनी सखोल चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार सदर गुन्ह्यात पवन राजेंद्र क्षिरसागर यास अटक करणेत आलेली आहे. तसेच त्याने गुन्हा करण्यासाठी वापरलेला त्याचे ताब्यातील मोबाईल गुन्हयाचे कामी जप्त करणेत आलेला असुन सदर आरोपीस न्यायालयात हजर केले असता गुन्हयाचे पुढील चौकशी करीता मा. न्यायालयाने त्याची दि. १ एप्रिल रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केलेली आहे.सदरची कामगिरी ही पंकज देशमुख सो. (भा.पो.से) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, गणेश बिरादार सो., अपर पोलीस पोलीस अधीक्षक, बारामती विभाग.डॉ. सुदर्शन राठोड सो. उपविभागीय पोलीस अधिकारी, बारामती उपविभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, बारामती तालुका पोलीस ठाणे व तपास पथकातील माळेगाव पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी स.पो.नि. सचिन लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक तुषार भोर, पोलीस नाईक ज्ञानेश्वर सानप यांनी केलेली आहे.

# गौतम बँकेला १.१७ कोटीचा निव्वळ नफा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी प्रतिनिधी :** कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे आधारस्तंभ मा.आ.अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार आशुतोष काळे यांच्या नेतृत्वाखाली गौतम सहकारी बँकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नेत्रदीपक कामगिरी करतांना विक्रमी ०१ कोटी १७ लाख रुपये निव्वळ नफा मिळविला असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष संजय आगवन, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण पावडे व प्रशासकीय अधिकारी बापूसाहेब घेमूड यांनी ही माहिती दिली आहे. दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे असे म्हटले आहे की, काही वर्षापूर्वी अतिशय खडतर परिस्थिती निर्माण झालेली असतांना देखील न डगमगता या परिस्थितीवर मात करत प्रगतीच्या दिशेने मार्गक्रमण करून गौतम सहकारी बँक सातत्याने प्रगतीच्या दिशेने झेप घेत आहे. सचोटी व बँकेचे ठेवीदार,कर्जदार यांच्या विश्वासावर दरवर्षी नफ्याचा विक्रम स्थापित करीत आहे. बँकेच्या अहिल्यानगर जिल्ह्यासह नाशिक जिल्ह्यात एकूण नऊ शाखा कार्यरत असून सर्व शाखा प्रगतीपथावर असून त्या-त्या शाखेच्या कार्यक्षेत्रातील छोटे-मोठे व्यावसयिक, शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार तसेच कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कर्मचारी यांची वेळेत आर्थिक गरज पूर्ण करणारी संस्था म्हणून गौतम बँकेने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. जागतिक स्पर्धेच्या युगात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जावून आपली प्रगती साधण्यासाठी बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करून बँकेच्या सर्व ग्राहकांना डिजिटल सेवा उपलब्ध करून दिल्यामुळे बँकेचा बहुतांश कारभार पेपरलेस होवून बँकेचा आर्थिक खर्च वाचविला आहे. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात ०१ कोटी ५० लाखाच्या तरतुदी करून बँकेस ०१ कोटी १७ लाखाचा निव्वळ नफा मिळाला आहे. वार्षिक सभेत मान्यता घेऊन सभासदांना लाभांश वाटप करणार असल्याचे बँक व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे.बँकेने केलेल्या दिमाखदार कामगिरीबद्दल मा.आ.अशोकराव काळे, आ.आशुतोष काळे यांनी बँकेचे चेअरमन, व्हा.चेअरमन, सर्व संचालक मंडळ, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक केले आहे.

# श्रीराज घोरपडे याचे नवोदय परीक्षेत यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील रयत शिक्षण संस्था संचलित स्व. सौ. एस. के. सोमैय्या प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्रामधील विद्यार्थी श्रीराज युवराज घोरपडे याने जवाहर नवोदय परीक्षा २०२४ मध्ये यशस्वी होत घवघवीत यश संपादन केले आहे. श्रीराज यास वर्गशिक्षक जालिंदर जाधव, विषय शिक्षक नानासाहेब ताके, मेघा पवार, महेश डाळींबकर तसेच स्पर्धा परीक्षा प्रमुख अनिता चेडे यांचे मार्गदर्शन लाभले.



श्रीराज याच्या यशाबद्दल रय शिक्षण संकुलाच्या अध्यक्षा मीनाताई जगधने, विद्यालयाच्या मु'याध्यापिका पैठणे यांनी अभिनंदन केले असून तो येथील प्रसिद्ध गायत्री ट्रेडर्स चे मालक युवराज व स्नेहा घोरपडे यांचा मुलगा असून निलेश घोरपडे यांचा पुतण्या आहे. त्याचे समर्थ ग्रुप नेवासा रोड मित्र मंडळाने अभिनंदन केले आहे.

# जिवन सुखमय करण्यासाठी भगवंताचे स्मरण करा : ह.भ.प जंगले शास्त्री

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पानेगांव :** जिवन सुखमय करण्यासाठी भगवंताचे स्मरण सेवा, करा निश्चितच आपल्या जिवनात आमुलाग्र बदल झाल्याशिवाय राहणार नाही असे पानेगांव (ता नेवासे) येथे संत ज्ञानेश्वर महाराज ५९ अखंड हरिनाम सप्ताहाचा काल्याच्या किर्तनरुपी सेवेत ह.भ.प भगवान महाराज जंगले शास्त्री आपल्या वाणीतून किर्तन रुपी सेवा देताना सांगितले. कंठी धरला कृष्ण मनी अवघा जगी प्रकाश जगतगुरू संत तुकाराम महाराज यांचा अभंग विवेचन करताना भगवंताला आपल्या अंतःकरणात कंठामध्ये वाणी, काया, वाचा, मन वृद्धिंगत केल्यास भगवंताची प्राप्ती होते मनुष्यदेहाला उर्जा सुख शक्ती समृद्धी मिळते. काल्याचा महाप्रसाद हा पुण्यवानांनच मिळतो काल्याचा प्रसाद घेण्यासाठी देवदूतांना अवतार घ्यावा लागला. आपण भाग्यवान आहात आपल्याला काल्याचा प्रसाद मिळतो. गोपाल कृष्ण भगवंताचा लिला सांगून मंत्रमुग्ध केले. अखंड हरिनाम सप्ताह तथा कीर्तन सोहळा संपन्न झाला परिसरातील पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळ उपस्थित होते , सप्ताह कालामध्ये परिभाजकाचार्य स्वामी भारतानंदगिरी महाराज यांची गुढी पाडव्याच्या मुहूर्तावर आगमन व दर्शन सोहळा संपन्न झाला. दहीहंडी फोडून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली व आमटी भाकरी भात - काला महाप्रसादाचे सर्वांना वाटप करण्यात आले. पुर्व संध्येला विद्यार्थ्यांन साठी रांगोळी निबंध स्पर्धा आयोजन करुन विजेत्यांना पारितोषिके देवून गौरविण्यात आले.

# ग्रामीण विद्यार्थी बनताहेत लाखोच्या पॅकेजचे मानकरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव:**संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजचा मेकॅनिकल इंजिनिअरींग विभाग आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नाने बर्नस अँड मॅकडॉनेल इंडिया या कंपनीने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह अंतर्गत सहा अभियंत्यांची वार्षिक पॅकेज रू ५. २५ लाखांवर नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे एका मागे एक कंपनी संजीवनीच्या अभियंत्यांची नोकरीसाठी निवड करीत असुन याद्वारे ग्रामिण भागातील मुलं मुली वयाच्या २२ व्या वर्षी लाखोच्या पॅकेजचे मानकरी बणुन संजीवनीच्या माध्यमातुन ग्रामिण अर्थकारणाला चालना देत आहे, अशी माहिती कॉलेजच्या वतीने देण्यात आली आहे. अभियांत्रिकी, पर्यावरण, खरेदी आणि प्रकल्प व्यवस्थापन, इत्यादी क्षेत्रात सेवा प्रदान करणाऱ्या बर्नस अँड मॅकडॉनेल इंडिया कंपनीने निवड केलेल्या अभियंत्यंमध्ये मानसी देवकर, वैष्णवी प्रमोद कंक्राळे, अक्षय कापसे, केशव मोरे, चैतन्य सुहास राच्चा व राम चांगदेव शेवाळे यांचा समावेश आहे.

# पारनेरला स्वामीसमर्थ प्रकटदिन उत्साहात...

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** - शहरामधे श्रीस्वामी समर्थ प्रकटदिन उत्साहामधे संपन्न झाला.सकाळी ८ वाजता भूपाळी, आरती व प्रसाद वाटप झाले. सकाळी ८.१५ वाजता स्वामी चरित्र सारामृत वाचन,होम हवन व अभिषेक झाला.तसेच ११ माळा 'श्री स्वामी समर्थ' षडाक्षरी मंत्राचे हवन झाले.

सकाळी १०.३० वाजता नैवेद्य, गोपाळकाला, व आरती झाली. सकाळी १२ वाजता विविध स्तोत्र व मंत्र यांचे सामुदायिक वाचन झाले.दुपारी ३ ते ५ पंचांग वाचन,वर्षभरातील सण,वार,व्रत वैकल्यांचे प्रात्यक्षिक. सायंकाळी ५ ते ६ सांस्कृतिक कार्यक्रम,गवळणी,भारुडे, फुगड्या, वासुदेव, पांगुळ, वाघ्या आदीसह जप,वाचन,मनन, चिंतन,ध्यान व महाराजांना सेवा समर्पित करणे,सामुहिक आरती आदी कार्यक्रम झाले. सायंकाळी ६.३० वाजता- दिवसभरातील विविध माध्यमातून महाराजांची केलेली सेवा त्यांना समर्पित करणे, आरती व प्रसाद. भगवान दत्तात्रेयांचा विश्वकल्याणाचा हा स्वामींचा जो अवतार आहे तो त्यांच्या युगायुगींच्या अनेक अनुभूतीतून साकार झालेला आहे व आजही महाराज आपल्यातच आहेत. दिवसभर सेवेकरी भाविक भक्तांनी रांगेमधे दर्शन घेतले.



पारनेर शहरातील स्वामी समर्थ केंद्रामधे स्वामीसमर्थ प्रकटदिन साजरा झाला. छाया : दत्ता गाडगे

# वृक्ष लावनेच नव्हे तर त्यांचे संवर्धनही तितकेच महत्त्वाचे : शिवकुमार सेल्वा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उरुळी कांचन :** "सध्या संपूर्ण जग तापमानवाढीच्या दुष्परिणामांना सामोरे जात आहे. यावर उपाय म्हणून मोठ्या प्रमाणात देशी वृक्षांची लागवड करणे काळाची गरज आहे. वृक्षांमुळे जैवविविधता वाढते, जलस्रोतांचे संवर्धन होते आणि नैसर्गिक समतोल टिकून राहतो. केवळ वृक्ष लावनेच नव्हे तर त्यांचे संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन जॉन्सस कंट्रोल इंडिया प्रा.लि. चे उपाध्यक्ष शिवकुमार सेल्वा यांनी केले. जागतिक वन दिन व जागतिक जल दिनाचे औचित्य साधून जॉन्सस कंट्रोल इंडिया प्रा. लि. आणि उरुळी कांचन येथील भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कोडीत (ता. पुरंदर) येथे १२५० देशी वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली. या उपक्रमामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अनेक मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



यावेळी मनिष जेठवानी, प्रसन्न बारी, वर्तिका जिंदाल, सौम्यला नाझली, संतोष चिखले, नितीन राऊत, मोहन शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्थेचे प्रकल्प संचालक प्रकाश जगताप, दत्तात्रय लोंढे, अक्षय राऊत, जयेश खन्ना, शेखर मरकड यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

पुढे बोलताना शिवकुमार सेल्वा म्हणाले, हरितवायूंच्या उत्सर्जनामुळे तापमान वाढत आहे. झाडे कार्बन डायऑक्साईड शोषून घेऊन पर्यावरणाचे रक्षण करतात. एक एकर क्षेत्रातील झाडे एका कारने २६ हजार किलोमीटर धावताना उत्सर्जित होणारा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात. त्यामुळे प्रत्येकाने वृक्षारोपण याला प्राधान्य द्यावे.दरम्यान, भारतीय बहुउद्देशीय खादी व ग्रामोद्योग शिक्षण संस्थेचे प्रकल्प संचालक प्रकाश जगताप यांनी वृक्ष लागवडीच्या शास्त्रीय पद्धतीचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यांनी झाडांमुळे होणाऱ्या फायद्यांवर प्रकाश टाकला. झाडांमुळे हवेची गुणवत्ता सुधारते, तापमान घटत, जलप्रदूषण कमी होते आणि जमिनीची धूप थांबते. तसेच वन्यजीवांना सावली आणि पाण्याची सोय होते, वृक्षलागवडीसारख्या उपक्रमांमुळे पर्यावरण संतुलन साधले जाईल आणि भविष्यासाठी स्वच्छ व निरोगी वातावरण उपलब्ध होईल, असा विश्वास मान्यवरांनी यावेळी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांच्या शाश्वत विकास वाढीसाठी कटीबद्ध : पुष्कर वैद्य

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उरुळी कांचन :** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना भौतिक सुविधा पुरवित या शाळांमध्ये शिकत असलेल्या सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि शाश्वत विकास वाढीसाठी आम्ही काम करीत आहोत असे प्रतिपादन अ‍ॅडव्हान्टा एंटरप्राइजेस लिमिटेडचे व्यवस्थापक पुष्कर वैद्य यांनी केले.अ‍ॅडव्हान्टा कंपनीच्या माध्यमातून माळेवाडी व गडदे वस्ती जिल्हा परिषद शाळांना ३ किलो वॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच पुरवण्यात आले त्यांचे उद्घाटन आणि विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करताना ते बोलत होते. शाळेच्या भौतिक विकासासाठी अ‍ॅडव्हान्टा लिमिटेड, ग्रामपंचायत डोंगरगाव,पिराजी गडदे परिवार, बालाजी ग्रुप, सुरेश गायकवाड आदींनी माजी उपसरपंच रमेश गायकवाड यांचे माध्यमातून भरीव योगदान दिले, या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळेवाडी व गडदे वस्ती, डोंगरगाव ता. हवेली यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक कार्यासाठी मदत करणाऱ्या संस्था आणि दानशूर व्यक्तींचा 'कृतज्ञता सन्मान सोहळा' आयोजित करण्यात आला होता. पुण्याशेजारील हवेलीत जमिनीचे दर गगनाला भिडले असताना पिराजी गडदे आणि कुटुंबियांनी शाळेसाठी सुमारे दहा लाख रुपये किमतीची २ आर जमीन दान दिली, या भूमिदाना बद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. ग्रामपंचायत डोंगरगावच्या माध्यमातून शाळेस वस्तु आणि रक्कम रूपात सुमारे साडेसहा लाख रुपये असे भरघोस योगदान प्राप्त झाले. त्याबद्दल त्यांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला या कार्यक्रमात केंद्रप्रमुख अंकुश बडे, अ‍ॅड. सुनील करपे, सरपंच रजनी कांबळे, अ‍ॅडव्हान्टा एंटरप्राइजेस लिमिटेडचे महेंद्र पटेल, तंटामुक्तीचे अध्यक्ष अनिल गायकवाड, माजी सरपंच विक्रम गायकवाड, श्याम शिंदे यांनी मार्गदर्शन केले प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घडते परंतु ग्रामीण भागाकडे एवढेही दुर्लक्ष व्हायला नको. अनेक मोठे अधिकारी, पदाधिकारी, राजकारणी जिल्हा परिषद शाळेतून शिकलेलेच विद्यार्थी आहेत, आपण सर्वांनी राजकारण बाजूला ठेवून सामाजिक आणि शैक्षणिक बांधिलकी जपत एकत्र येत या शाळांना मुक्तहस्ते मदत करावी असे आवाहन कार्यक्रमाचे अध्यक्ष, माजी उपसरपंच रमेश गायकवाड यांनी केले. यावेळी उपेंद्र कहालेकर, सुशांत सुतार, सत्यजित जाधव, विक्रांत दास,



उपसरपंच सोमनाथ गायकवाड,हनुमंत गायकवाड, सुजाता गडदे, संध्या गडदे,प्रियांका गायकवाड,माजी सरपंच बाबासाहेब गायकवाड, विद्यार्थी, पालक, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शहाजी नगरे,सूत्रसंचालन सुरेश गडदे तर आभार प्रदर्शन संदीप गारकर यांनी केले.

द • ख • ल

## महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील स्मृतिदिन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या त्यागातूनच रयत शिक्षण संस्था उभी राहिली. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील कर्मवीरांची सावली होती, असे विचार महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी व्यक्त केले. लक्ष्मीबाई भाऊराव



पाटील यांच्या स्मृतिदिन प्रसंगी सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अनंत सोनवणे यांनी प्रस्तावना केली. याप्रसंगी उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, प्रो. डॉ. राजेंद्र ठाकरे, अधीक्षक बाळासाहेब राऊत, डॉ. रावसाहेब काळे, प्रा. अरुण जाधव, डॉ. राहुल गायकवाड, प्रा. अनिल ढवळे, ग्रंथपाल यशोदा लबडे, प्रा. श्रीकांत थोरात, डॉ रामदास ढगे आदी प्राध्यापक महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## खोटी साक्ष देणाऱ्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर:** न्यायालयात शपथेवर खोटी साक्ष देणाऱ्याविरुद्ध अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी एल. एस. पाढेन यांनी गुन्हा दाखल करण्याचे आदेश नुकतेच दिले.अहिल्यानगर येथील एका मिळकतीसंदर्भात अश्रू यादव नरोटे, नरेश विष्णुपंत कोडम, जयश्री नरेश कोडम यांच्यात दिवाणी न्यायालयामध्ये दावा प्रलंबित आहे. सदरील दाव्यामध्ये रूपेश प्रकाश कोडम यांनी नरेश विष्णुपंत कोडम व जयश्री नरेश कोडम यांच्या वतीने न्यायालयात हजर राहून साक्ष दिली. या साक्षीमध्ये त्यांनी एका दस्तासाठी उपस्थित असल्याचे न्यायालयात शपथपूर्वक सांगितले. दरम्यान, अश्रू यादव नरोटे यांनी माहितीच्या अधिकारात सदरील व्यक्ती हा साक्ष देताना, कार्यालयात उपस्थित होता, असे सांगितले. तसेच त्याने शासकीय सेवेत रजा घेतलेली नसल्याची बाब माहितीच्या अधिकारातील कागदपत्रांच्या माध्यमातून न्यायालयासमोर सादर केली. त्याप्रमाणे न्यायालयात नरेश विष्णुपंत कोडम, जयश्री नरेश कोडम, रुपेश प्रकाश कोडम यांनी संगनमताने कट करून खोटा पुरावा तयार करण्याच्या हेतूने खोट्या साक्षी दिल्या, अशा स्वरूपाची खासगी फिर्याद दाखल करून सदरील साक्षीदाराने खोटी साक्ष देऊन न्यायालयाची दिशाभूल केली. आश्रू यादव नरोटे यांच्या मिळकतीसंदर्भात खोटा पुरावा तयार करण्याचा प्रयत्न केला, अशा स्वरूपाची फिर्याद दाखल केली होती. सदरील फिर्यादीच्या अनुषंगाने न्यायाधीश पाडेन यांनी भिंगार पोलिस ठाण्याला आदेश देऊन त्यांच्याकडून प्रथमतः सदरील बाबीसंदर्भात अहवाल मागविला होता.सदरचा अहवाल न्यायालयामध्ये प्राप्त झाल्यानंतर न्यायालयाने अहवालाचे अवलोकन करून फिर्यादी अश्रू यादव नरोटे यांच्या अर्जाप्रमाणे भारतीय न्याय संहितेच्या कलम १७५ प्रमाणे भिंगार पोलिस ठाण्याने त्यांची फिर्याद दाखल करून घेऊन, त्याप्रमाणे तपास करण्याबाबत आदेश दिला आहे. फिर्यादी अश्रू नरोटे यांच्या वतीने गोरक्ष पालवे यांनी युक्तिवाद केला. त्यांना ॲड. गुरविंदर पंजाबी, ॲड. रोहित बुधवंत, ॲड. सागर गर्जे, ॲड. अपेक्षा बोरुडे यांनी साहाय्य केले.

## भारत विद्यालयातील विद्यार्थांची नववर्षानिमित्त शुभेच्छा दिंडी

भाऊसाहेब वाडगे

**मिरजगाव** – मिरजगाव येथील हिंद सेवा मंडळाच्या भारत विद्यालयातील विद्यार्थांनी टाळ मृदगां बरोबरच हरीनामाच्या पताका हाती घेऊन सपुंर्ण मिरजगाव व बाजार पेठेमधुन हरी नामाचा गजर करत दिंडीचे आयोजन करण्यात आले होते , कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील भारत विद्यालया मध्ये चैत्र अमावश्या गुडी पाडव्याचे औचित्य साधत एक आगळा वेगळा ऊपक्रम हाती घेऊन मिरजगाव करांची तसेच शेजारील वाड्या वस्तीवरील नागरीक त्याच प्रमाणे पालक वर्गांची देखील मने जिंकली ,

हि संकल्पना हिंद सेवा मंडळाचे नवनिर्वाचित कार्यअध्यक्ष डॉ रमेशचन्द्र झरकर, व विद्यालयाचे मुख्याध्याक किशोर खुरांगे त्याच बरोबर मंडळाचे प्रसाशकीय पदाधिकारी संजय मुदगल यांच्या संकल्पणेने हा उपक्रम राबविण्यात आला ,या दिंडी सोहळ्या मध्ये विद्यार्थीनीनी नववारी काष्टी साडी तर विद्यार्थांनी कुर्ता पायजमा गळ्या मध्ये टाळ हातात पताका व काहि घोष वाक्याचे फलक घेत भारत विद्यालय,क्रांती चौक,मुंजोबा चौक,तसेच ईलाजी चौक येथे सर्वांनाच विद्यालयाच्या स्कुल कमिटीचे सदस्स संजय बगाडे यांच्याकडुन लिंबु सरबतचा प्रसाद देण्यात आला त्या नंतर मिरजगाव नगर अर्बब बँक समोर बालाजी मंदिर येथे सर्व विद्यार्थांना गणेश झरकर यांच् वतीने बिस्किट पुड्याचे वाटप करण्या आले. या वेळी विद्यालया तील मुलींनी व्यापारी वर्गाला औक्षंण करत असतांना नागरीक ,पालक,व व्यापारी वर्गा मध्ये एक अपुलकीचे वातावरण दिसत होते,

हा उपक्रम राबवीण्या करीता विद्यालयाचे जेष्ट शिक्षक राजेंद्र नवले,सतिष फरताडे,गौतम रसाळ, भाऊसाहेब वाडगे,कल्याण गवारे, अन्सार तांबोळी, विनोद देसाई, दादा शिंगाडे, निशा बावडकर मॅडम, विनोद जोशी,तर शिक्षेत्तर कर्मचारी वर्ग अमोल बागल,अनिल वतारे,नंदकुमार भालेराव,संतोष मुठाळ, आदिनी विषेश परीश्रर घेतले,



# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे आरोग्य जपले जाते : उद्योजक रांका

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** – आनंदऋषीजी हॉस्पिटलध्ये रुग्णांची मानसिकता समजावून घेऊन त्यांच्या आजाराने योग्य ते निदान करून उपचार केले जातात. रूग्णाचे आरोग्य जपले जाते, असा विश्वास रांका ज्वेलर्सचे किरण रांका यांनी व्यक्त केला. राष्ट्रसंत आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३३ व्या स्मृतीदिनानिमित्त श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित व श्रीमती बिजयाबाई मोहनलालजी रांका, श्री संजयजी, चंद्रकांतजी व किरणजी रांका परिवार प्रायोजित 'दुबिर्णीव्दारे शस्त्रक्रिया' या मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. तेव्हा ते बोलत होते. यावेळी सुर्यकांतजी रांका, नारंगीबाई शिंगवी, .अनिताताई रांका,.प्रीतम रांका, तज्ञ डॉ. लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ.भास्कर जाधव, डॉ.आर.एन.पांडे, डॉ.राहुल कांडेकर, डॉ.रविंद्र मुथा, डॉ. हिरल चौधरी, संतोष बोथरा, सतिष लोढा, माणकचंद कटारिया, अनिल मेहेर आदि मान्यवर उपस्थित होते. डॉ.आशिष भंडारी यांनी स्वागत केले. उद्योजक किरण रांका पुढे म्हणाले, जैन सोशल फेडरेशनचे कार्यकर्ते, आनंदऋषिजी हॉस्पीटलमधील तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्सेस, कर्मचारी या




सर्वांचेच आपलेपणाचे सहकार्य रूग्णाला भावते. या शिबिर आयोजनात आमच्या रांका परिवाराला खारीचा वाटा मिळतो, हे आमचे भाग्यच आहे. यापुढेही शिबिराच्या आयोजनात सहभाग देत राहू, अशी ग्वाही देतो. प्रास्तविक करताना संतोष बोथरा म्हणाले, रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य हॉस्पीटलच्या माध्यमातून सुरु आहे. आचार्य श्रीआनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने आणि प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाने वैद्यकीय सेवा सुरू आहे. अत्यल्प दरात अद्ययावत मशिनरी व सुविधांसह येथील सेवा दानशूर व्यक्तींच्या योगदानामुळे दिली जात आहे. मागील एक महिन्यापासून सुरु असलेल्या या शिबीरामध्ये ४४४४ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन आवश्यक त्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. समाजसेवेचे हे व्रत असेच पुढेही चालू राहिल. यावेळी तज्ञ डॉ.आर.एन.पांडे म्हणाले, रुग्णांची सेवा आमच्या हातातून घडत आहे, हे आमचे भाग्य आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अनेक शिबीरे आयोजित करण्यात येतात. या शिबीरात चांगली सेवा दिली जात असल्याने असंख्य रुग्ण येतात या हॉस्पिटलचा नावलौकीक संपुर्ण जगात आहे. आम्ही डॉक्टर्स सुद्धा रुग्णांना चांगले मार्गदर्शन करतो. त्यामुळे रुग्णांना एक विश्वास मिळातो. तो संपुर्ण बरा होतो, असे सांगून शिबीरातील शस्त्रक्रियांची त्यांनी माहिती दिली. या शिबीरात दुर्बिर्णीव्दारे शस्त्रक्रिया (बिनाटाका) – लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीचे ऑपरेशन व जांघेतील हार्नियाची शस्त्रक्रिया, पित्ताशय काढणे, स्त्रीयांची गर्भाशयाची पिवशी काढणे (हिस्ट्रोक्टॉमी), स्टॅपलर, लेझर पाईल्स शस्त्रक्रिया, ॲपेडिक्स ऑपरेशन, लॅप्रोस्कोपी स्त्रीयांचे बिजांडपोशावरील गाठी शस्त्रक्रिया, स्त्रीयांचे व्यंध्यत्वाची तपासणी करीता गर्भनलिकेची ट्युबल पेटेन्सी, लॅप्रोस्पोपी स्त्रीयांचे कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया तपासणी करुन मार्गदर्शन करण्यात आले. या मोफत तपासणी शिबीरात १२७ जणांची तपासणी केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल मेहेर यांनी केले. सतिष लोढा यांनी आभार मानले.

## साकळाई उपसा योजनेला घोड धरणातील पाणी दिल्याने पाण्यासाठी संघर्ष अटळ ?

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा ;– नुकत्याच झालेल्या विधानसभा अधिवेशनात श्रीगोंद्यासाठी एका निर्णय घेण्यात आला तो म्हणजे साकळाई उपसा सिंचन योजनेसाठी घोड धरणातून तब्बल १.८ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय झाला आहे. त्यामुळे आगोदरच कमी मिळणाऱ्या पाण्यामुळे घोड लाभक्षेत्रात नाराजी असताना पुन्हा त्यात साकळाई साठी १.८ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय झाला असल्यामुळे भविष्यात घोड कॅनॉल ला पाणी येईल कि नाही यावर मोठ्या प्रमाणात प्रश्न चिन्ह उपस्थित केले जात आहे. आताच झालेल्या विधानसभा अधिवेशनात साकळाई योजनेसाठी घोड धरणातून पाणी आरक्षित करण्याचा निर्णय करण्यात आला त्याचे मांडवगण गटातून स्वागत करण्यात आले मात्र तालुक्यातील जवळपास निम्म्या पेक्षा अधिक तालुक्याची जीवनदाईनी म्हणून घोड धरणाची आणि त्याच्या पाटासह वितरिकांची ओळख आहे. घोड पट्ट्यातील जवळपास सर्वच शेकऱ्यांची शेती घोडच्याच पाण्यावर अवलंबून आहे. घोड लाभक्षेत्रातील शेती व शेतकरी यांनी आतापर्यन्त घोडच्या पाण्यावरच शेती केली जाते, त्यामुळे मोठ्या प्रमाणात ऊस पिकवला जातो त्यावर कारखानदारी अवलंबून आहे याबाबत तालुक्याचे राजकीय काही अपवाद वगळता तालुक्याचे नेतृत्व कायम 'घोड' लाभक्षेत्रातच राहिले आहे. तालुक्यात याबाबत अल्प प्रमाणात राजकारण पाहण्यास मिळाले मात्र सगळेच राजकारणी घोडवर विसंबून नसल्याचे चित्र आहे काहीजण कुकडीवर आहेत घोडच्या मात्र पाण्याबत त्यामुळे घोडबाबत आतापर्यंत सकारात्मक



शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण- ०३२४/प्र.क्र.१६३/२०२४/मोप्र-१

घोड प्रकल्पाचे पाणी वापराचे फेरनियोजन

शासन निर्णय क्र.संकीर्ण- ०३२४/प्र.क्र.१६३/२०२४/मोप्र-१

दिनांक- २१/०३/२०२५

" परिशिष्ट – अ "

| अ.क्र. | घोड प्रकल्पाचा मंजूर प्रकल्प अहवालानुसार पाणीवापर (अ.घ.फु.) | | महाराष्ट्र शासन पत्र दि.२०/१०/२००१ नुसार कृष्णा पाणी तंटा लवादास कळविलेला कलम VII नुसारचा घोड प्रकल्पाचा पाणीवापर (अ.घ.फु.) | | महाराष्ट्र शासन पत्र दि.२०/१०/२००१ नुसार कृष्णा पाणी तंटा लवादास कळविलेला कलम VII नुसारचा घोड प्रकल्पात साकळाई उ.सिं.यो. अंतर्भुत करून प्रस्तावित पाणीवापर (अ.घ.फु.) | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंचनासाठी पाणी वापर | १०.०० | सिंचनासाठी पाणी वापर | ९.७८ | सिंचनासाठी पाणी वापर | |
| | | | | | १) घोड प्रकल्प | ७.९८ |
| | | | | | २)साकळाई उ.सिं.यो. | १.६० |
| २ | पिण्यासाठी पाणीवापर | ....... | पिण्यासाठी पाणीवापर | ०.०६ | पिण्यासाठी पाणीवापर | |
| | | | | | १)घोड प्रकल्प | ०.०६ |
| | | | | | २)साकळाई उ.सिं.यो. | ०.०४ |
| ३ | औद्योगिक पाणीवापर | ....... | औद्योगिक पाणीवापर | ०.००८ | औद्योगिक पाणीवापर | |
| | | | | | १)घोड प्रकल्प | ०.००८ |
| | | | | | २)साकळाई उ.सिं.यो. | ०.०० |
| | एकुण प्रकल्प पाणीवापर | १०.०० | एकुण प्रकल्प पाणीवापर | ९.८४८ | एकुण प्रकल्प पाणीवापर | ९.६८८ |

CHIRAG HONAJI DHUM

(चिराग धूम)

उपसचिव, महाराष्ट्र शासन

निर्णय झालेले तालुक्याने पाहिले आहे मात्र मागील काही वर्षांपासून घोडला घरघर लागल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे त्यामध्ये घोड धरणातील औदयोगिक क्षेत्राला पाणी तसेच विविध ठिकाणच्या पिण्याचा पाणी योजना तसेच वाढती पाणी चोरी, होणारे उन्हाळ्यात होणारे बासपीभवन यामुळे धरणातील पाणीच कमी होवू लागले त्यावेळी अधिकाऱ्यांनी कुशलतेने शेतकऱ्यांची मागणी नसल्याचे कागदपत्री दाखविले आणि धरणातील पाण्याचा पैसा सरकारला दाखवून दिला तसेच घोड लाभक्षेत्रातील आवर्तने होऊनही जवळपास २.४ टीएमसी पाणीसाठा शिल्लक राहत असल्याचे जलसंपदा विभागाची आकडेवारी दिसते. त्यामुळेच आता साकळाई उपसा सिंचन योजनेला तब्बल १.८ टीएमसी पाणी देण्याचा निर्णय झाल्याने पुढे आल्याने होणाऱ्या टंचाईत आणखी भर पडली आहे. श्रीगोंद्यासह नगर तालुक्यातील दुष्काळी गावांना हक्काचे पाणी मिळणे गरजेचे आहे. मात्र, घोड प्रकल्पाच्या मूळ लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचीच दरवर्षी पाण्यासाठी ओरड पुढे येत असताना घोड धरणातून साकळाई उपसा सिंचन योजनेला पाणी देण्याचा घाट घालण्यात आल्याने या निर्णयाकडे शेतकऱ्याबरोबर राजकीय अस्थिरता जबाबदार आहे परिणामी बारमाही असणारा घोडचा कॅनॉल आठमाही झाला आणि आता तर चारमाही करण्यात आला आहे. अशीच परस्थिती राहिली तर कॅनॉल नुसता नावाला राहील मात्र पाणी कधीच येणार नाही असे विदारक चित्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही. घोडसमोरील अडचणी वाढल्या आहेत.घोडच्या उन्हाळी आवर्तनासाठी लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना नेहमीच संघर्ष करावा लागला आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याची अधिकची अडचण लक्षात घेऊन या निर्णयाला कायदेशीर आव्हान देण्याची गरज निर्माण

## पावसाच्या वातावरणामुळे कांदा उत्पादकांची तारांबळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यात सध्या अवकाळी पावसाचे वातावरण तयार झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांची तारांबळ उडाली असून पावसापासून कांद्याचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. प्लास्टिकचा कागद, ताडपत्री याच्या सहाय्याने शेतकरी वर्ग कांदा झाकून ठेवत आहे. महाग असणारे कागद खरेदी करून कांदे झाकावे लागत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत आला असून आर्थिक खर्चात वाढ झाल्याची जारकरवाडी येथील कांदा उत्पादक शेतकरी बाबाजी देवडे यांनी सांगितले. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात सध्या कांदा काढण्याच्या कामांना वेळ घेतला असून मोठ्या प्रमाणात काढण्याची कामे उरकली आहेत. परंतु कांदा काढल्यानंतर आरण करून साठवलेला कांदा पावसामुळे भिजण्याची शक्यता आहे. कांदा चाळीमधे साठवण्या आधी दहा दिवस कांदा मुरून दिला जातो आणि सध्या शेतात आरण लावून ठेवलेला कांदा अचानक येणाऱ्या पावसामुळे भिजु शकतो. अवकाळी पावसाचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरणीत साठवलेला कांदा पावसापासून संरक्षण होण्यासाठी कागदाच्या सहाय्याने शेतकरी झाकून ठेवत आहेत. परंतु कागद किंवा ताडपत्री खरेदी करून शेतकऱ्यांना हा कांदा झाकावा लागत आहे. त्यामुळे आर्थिक खर्च वाढत असून भांडवली खर्चात वाढ होत आहे. तर प्लॅस्टिकचा कागद वारे सुटल्यानंतर मोठ्या प्रमाणावर उडतो. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करून कांदा झाकावा लागत आहे.

## अखेर सरपंचाने ठोकले दारू दुकानाला टाळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील देशी दारूचे दुकान ३१ मार्च पुर्वी गावाबाहेर हलवावे अन्यथा त्यास टाळे लावण्याची मागणी केली होती.त्यानुसार उपसरपंच गणेश अकोलकर, रफीक शेख व ग्रामपंचायत सदस्यांनी दारू दुकानाला टाळे ठोकले. याबाबत सविस्तर असे की गेल्या काही दिवसांपासून करंजी ग्रामपंचायतीच्या विरोधी सदस्यांनी करंजी बस स्थानकाजवळ असलेले देशी दारूचे दुकान बस स्थानका पासुन दोन किलोमीटर अंतरावर हलवावे अशी मागणी केली होती. त्यासाठी ग्रामपंचायत कार्यालया समोर उपोषणही केले होते.त्या अनुषंगाने ग्रामपंचायतीने महिला ग्रामसभा बोलावून हे दोन किलोमीटर अंतरावर हलवावे यासाठी ठराव केला व तो बहुमताने मंजुर करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्या अनुषंगाने आज मंगळवारी सरपंच व ग्रामपंचायतचे सदस्य यांनी या देशी दारू दुकानाला टाळे ठोकले आहे.यावेळी उपसरपंच गणेश अकोलकर, सुनील विनायक अकोलकर,शिवाजीभाकरे,बाबासाहेब गाडेकर, महादेव नजन,सुनील आसाराम अकोलकर,बंडु मोरे,माजी चेअरमन अशोक अकोलकर,शशिकांत क्षेत्रे,बाबासाहेब क्षेत्रे, प्रदीप अकोलकर आदी उपस्थित होते. करंजी बसस्थानका जवळ असलेल्या देशी दारूच्या दुकानामुळे रस्त्याने जाणारे प्रवाशी, शाळेत जाणारे गावातील विद्यार्थी व महिला वर्गाला सातत्याने त्रास होत होता.याबाबत अनेक वेळा रफीक शेख व ग्रामस्थांनी आवाजही उठविला.मात्र उत्पादन शुल्क विभागाच्या काही नियमांमुळे हे होऊ शकले नाही. तसेच मागील सत्ताधाऱ्यांनी ही सत्ता असताना दारू दुकान बाहेर नेण्याचा पाठपुरावाच केला नाही त्यामुळे हे दारूचे दुकान गावाबाहेर गेले नाही.आता पुन्हा एकदा शिवसेनेची सत्ता आली असुन हे देशी दारूचे दुकान गावाबाहेर जाण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये पाठपुरावा केला गेला मात्र त्यात यश आले नाही.



**विरोध दारू दुकानाला कि सत्ताधाऱ्यांना**

**देशी दारूचे दुकान गावाबाहेर हलवावे ही विरोधकांची नव्हे तर आमचीही भावना आहे.मात्र ग्रामपंचायत च्या पातळीवर ग्रामपंचायत प्रयत्न करत आहे.उत्पादन शुल्क विभागाच्या नियमानुसार ते कारवाई करत आहेत.मात्र फक्त देशी दारूचे दुकान हलवावे अशी मागणी करून विरोधक कोणतेही सहकार्य करत नाही तसेच देशी दारूच्या दुकानाला विरोध आहे कि विरोधाला विरोध आहे हे समजत नसल्याचे उपसरपंच गणेश अकोलकर यांनी यावेळी सांगितले.**

## छत्रपती महाविद्यालयास उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे राज्यस्तरीय ३ पुरस्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्राद्वरे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सन २०२४–२५ करता करिअर कट्टा अंतर्गत एकूण ३ राज्यस्तरीय पुरस्कार घोषित झाले होते. दि. २९ मार्च रोजी पुणे येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, येथे छत्रपती शिवाजी महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून अहमदनगर जिल्ह्यातून व्दितीय क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल पुरस्कार वितरीत झाला. या पुरस्काराचे वितरण राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते झाले यापूर्वी दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे राज्याचे उद्योगमंत्री



. उदयजी सामंत यांच्या उपस्थिती मध्ये २ पुरस्कारांचे वितरण झाले. यामध्ये डॉ. सतीशचंद्र सुर्यवंशी यांना उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक आणि प्रा.विलास सुद्रिक यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक या पुरस्कारांचा समावेश होता. तसेच सहकारमहर्षी माजी आमदार स्व. शिवाजीराव नागवडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने १९८२ साली महाविद्यालय सुरू केले. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत संस्थेच्या गुणात्मक प्रगतीसाठी अथक परिश्रम घेतले. ९९ विद्यार्थी संख्येवर सुरू झालेले महाविद्यालय, आज ४हजार २०० विद्यार्थी अध्यापन करत आहे.१६ एकर भौतिक सुविधा असलेला सुंदर परिसर आहे. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची उत्तम प्रगती सुरू आहे.'नॅक'मध्ये मिळविलेले ए प्लस मानांकन आणि पुरस्कारांची हॅट्रिक होणे त्याचे द्योतक आहे.

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी शुभेच्छा देत, प्राध्यापक व विद्यार्थी यांच्या कष्टातून उत्तम प्रावीण्य मिळवत आहेत.विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक विकासाला प्राधान्य दिले जाते. परिणामी उच्चतम निकाल व आधुनिक तंत्रज्ञानचा वापर यामुळे महाविद्यालय नावारूपाला आले असल्याची प्रतिक्रिया दिली.

प्राचार्य डॉ.सतीशचंद्र सूर्यवंशी यांचे व्यवस्थापन आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाने २०२४ या वर्षात ५० विद्यार्थ्यांची पोलीस, वनरक्षक,इतर सरकारी नोकरीमध्ये तसेच कॅम्पस मुलाखतीद्वरे बँक व इंडस्ट्रीमध्ये १४१ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड झाली. अनेक विद्यार्थी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातून अध्यापन करत आहेत तसेच प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. बापूंनी बिकट परिस्थितीत या संस्थेच्या गुणात्मक प्रगतीसाठी जीवाचे रान केले. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम राजेंद्र (दादा) नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण करत आहोत अशी प्रतिक्रिया कॉलेजचे प्राचार्य डॉ.सुर्यवंशी यांनी दिली.

या यशाबद्दल शिक्षक व शिक्षकेतर वृंदाचे संस्थेचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस,जिल्हा बँक संचालिका अनुराधाताई नागवडे, निरीक्षक सचिनराव लगड व सर्व संस्थेचे

# 'एमआयडीसी'ला खांडवी कोंभळीतील शेतकऱ्यांचा तीव्र विरोध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** खांडवी कोंभळी परिसरात होवू घातलेल्या एमआयडीसी ला शेतक–यांनी तीव्र विरोध दर्शविला असून जिवाची परवा न करता एमआयडीसी विरोधात आंदोलन करण्याचे पत्रकार परिषदेत जाहीर केले. प्रस्तावित एमआयडीसी ही कोंभळी – थेरगाव–रवळगाव या ठिकाणी होती परंतु ही एमआयडीसी खांडवी–कोंभळी येथे होत असल्याचा आरोप करत घाईगडबडीत १४ ऑक्टोबर ला आचारसंहिता लागण्यापूर्वी खांडवी–कोंभळी परिसरात होणार असल्याची अधिसूचना काढून खांडवी–कोंभळी च्या बागायती जमीनीवर एमआयडीसी च्या नोंदी लावून सरकारने विश्वासघाताने एकतर्फी कार्यवाही सुरू केल्याने खांडवी–कोंभळी येथील शेतकरी चांगलाच आक्रमक झाला असून खांडवी–कोंभळी शेत जमिनी बचाव कृती समितीच्या नेतृत्वाखाली शेतक–यांनी एमआयडीसी ला विरोध दर्शविला असून मोठ्या प्रमाणात शेतकरी, महिला मुले ज्या जमीनीवर एमआयडीसी होत आहे तिथे जमून पत्रकारांसमोर तीव्र नाराजी व्यक्त करून प्रशासनाचा व राजकीय नेत्यांचा निषेध करून रद्द करा.रद्द करा एमआयडीसी रद्द करा, आमच्या काळ्या आईचा सौदा रद्द करा, सुपीक जमिनीतून एमआयडीसी हद्द पार करा यासह बेकायदेशीर एमआयडीसीला १०० टक्के विरोध असा घोषणा देवून परिसर दणाणून सोडला होता. यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की रक्त सांडले तरीसुद्धा या बागायती जमीनीवर एमआयडीसी होवू दिली जाणार नाही. आम्ही जमीन देणार नाही आम्ही भूमीहीन होणार आहोत पै पैसा गोळा करून अनेकदा पोटाला चिमटा घेऊन या जमीनी बागायती केल्या मोठ्या प्रमाणात जमिनीत पैसा घातला आम्ही आत्महत्या करू जीव पण एमआयडीसी ला मरेपर्यंत विरोध करू आमचा जीव तळमळत आहे आमच्या वर वार करा आम्हाला मारून टाका मग आमच्या जमीनी घ्या आम्हाला या जमीनी शिवाय जगता येणार नाही. कोणतीही सुचना नाही यासाठी शेतकऱ्यांना कुठलीही पूर्वकल्पना देण्यात आलेली नाही शेतकऱ्याची संमती घेतली नाही १९६१ च्या ३२ कलम आणलेला आहे ,हे पूर्ण शेतकऱ्यांना जमीन हस्तांतरताना करण्यास त्याला भाग पाडतोय यासंदर्भात आम्ही खांडवी–कोंभळी बचाव समीती मार्फत विरोध दर्शविला असून कोणत्याही परिस्थितीत एमआयडीसी होवू देणार नाही. कोणत्याही प्रकारची सुचना चर्चा न करता डायरेक्ट अधिग्रहण करणार



आहेत हे आम्हांला सांगण्यात आले आहे. स्थळ पाहणी नाही कोणताही प्रकल्प होण्याअगोदर ग्रामपंचायत किंवा शेतकऱ्यांना चौकशी न करता नोटीस न देता आमच्या जमीनी वर अधिग्रहण शिक्का मारून मनमानी पध्दतीने जर कारभार केला तर शंभर टक्के विरोध राहणार असे ठणकावून सांगितले यावेळी लोकप्रतिनिधीसह तालुका प्रशासनाच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया देत रोष व्यक्त निषेध केला. कर्जत तालुक्यातील कोंभळी–थेरगाव–रवळगाव एमआयडीसीला खांडवी आणि परिसरातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला असून आमच्या शेत–जमिनीवर शासनाने चुकीच्या पद्धतीने उताऱ्यावर नोंद लावली असल्याचा मंगळवारी शेतजमीन बचाव कृती समितीच्यावतीने निषेध करण्यात आला. कर्जत–जामखेड मतदारसंघासाठी एमआयडीसीकरीता तालुक्यातील कोंभळी–थेरगाव आणि रवळगाव परिसरातील जमिनीचे अधिग्रहण प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू झाली आहे. मंगळवार, दि १ रोजी खांडवी परिसरातील सर्वसामान्य शेतकऱ्यांनी महिलांसह आंदोलन करीत शेतजमीनीच्या उताऱ्यावर विक्री करण्यास मनाई केल्याची नोंद लावल्याने निषेध व्यक्त केला. यावेळी देत राज्यसरकारसह तालुका प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी केली.

चाळीस वर्षापासून आम्ही पाण्यासाठी संघर्ष करतोय आम्हाला पाणी उपलब्ध करून दिले पाहिजे होते. आम्ही शेततळे विहीरी खोदून आमच्या जमीनी बागायती केल्या या जमीनी वर मोठ्या प्रमाणात फळबगा, पोल्ट्री, विट भट्टी व इतर बागायती पीक असून आम्हाला रोजगाराची गरज नाही आम्ही तुम्हाला रोजगार देवू या एमआयडीसी चा फायदा आम्हाला नाही तर तुम्हाला च आहे म्हणून म्हणतोत की पुढारी तुपाशी अन शेतकरी उपाशी त्यामुळे यापुढे आम्ही आमचा संघर्ष लढा मोठ्या प्रमाणात लढू या एमआयडीसी मुळे साठ टक्के लोक भूमीहीन होणार आहेत

पुढा–यांना गाव बंदी खांडवी–कोंभळी परिसरातील बागायती व सुपीक जमिनी वरील एमआयडीसी रद्द होत नाही तोपर्यंत सर्व पुढा–यांना या परिसरात गाव बंदी करण्यात आली आहे. अशी घोषणा करण्यात आली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ | अहमदनगर | पान नं. ८

## अहिल्यानगर जिल्हा बँकेत ११.७ कोटी रुपये पडले धूळखात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : राज्यातील काही जिल्हा बँकांकडे कोट्यवधी रुपयांची रक्कम आहे. परंतु या रकमेचे मूल्य शून्य रुपये आहे. बँकेच्या हिशेबी ही रक्कम शिल्लक असली तरी ८ वर्षांपासून त्याचा निर्णय लागत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ नोव्हेंबर २०१६ रोजी नोटीबंदी जाहीर केली होती. त्या काळापासून राज्यातील ८ जिल्हा बँकांमध्ये कोट्यवधी रुपयांची रक्कम पडून आहे. १०१.१८ कोटींच्या रकमेचे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. त्यावर एप्रिल महिन्यात निकाल लागण्याची अपेक्षा आहे. अहिल्यानगरच्या जिल्हा बँकेतही ११.७ कोटी रुपये पडून आहेतय

नोटा बंदीनंतर बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद असलेले चलन जमा करण्यात आले. राज्यातील ८ जिल्हा बँकेत तब्बल १०२ कोटी रुपयांची रक्कम तेव्हापासून पडून आहे. रिझर्व्ह बँकेच्या चुकीच्या धोरणामुळे हे पैसे अडकून पडले आहेत. सध्या हे सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यामुळे जिल्हा बँकांचीही अडचण निर्माण झाली आहे. या नोटा हिशोबात धरायच्या का नाही? याबाबत बँका गोंधळात आहेत. या प्रकरणी आता एप्रिल महिन्यात सुनावणी होणार आहे, असे राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी सांगितले.

### राज्यातील जिल्हा बँका व नोटाची स्थिती

कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा बँकेकडे सर्वाधिक २५.३ कोटी रुपयांची रक्कम पडून आहे. त्यानंतर पुणे जिल्हा बँकेचा क्रमांक आहे. पुणे जिल्हा बँकेतही २२.२ कोटी रुपये नोटीबंदीनंतरचे आहेत. नाशिक जिल्हा बँकेकडे २१.३ कोटी रुपये, सांगली जिल्हा बँकेकडे १४.७ कोटी रुपये, अहिल्यानगर जिल्हा बँकेकडे ११.७ कोटी रुपये, नागपूर जिल्हा बँकेकडे ५ कोटी रुपये, वर्धा जिल्हा बँकेकडे ७८ लाख तर अमरावती जिल्हा बँकेकडे ११ लाख रुपये पडून आहेत. ही सर्व रक्कम १०१.२ कोटी रुपये आहे.बँकांकडे असलेल्या नोटबंदीनंतरच्या शिल्लक नोटांना एसबीएन (स्पेसिफाइड बँक नोटस) म्हटले जाते. म्हणजे या नोटा आहेत, मात्र त्याची किंमत शून्य आहे. या नोटांची किंमत शून्य असली तरी बँकांना त्या जपून ठेवणे कायद्याने बंधनकारक आहे. पाचशे आणि हजारच्या या जुन्या नोटा सांभाळण्यासाठी बँकांची चांगलीच कसरत होत आहे.

## पुतळा विटंबनाप्रकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा

### हिंदू समाजाची पोलिस प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : २६ मार्चला अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केली. या घटनेमुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्याने सकल हिंदू समाज रस्त्यावर उतरला असून या घटनेमुळे सर्वत्र तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने वारंवार केलेल्या विनंतीला मान देऊन व त्यांनी दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून हिंदु समाजाने आंदोलन व बंद तात्काळ मागे घेतले. परंतु ६ दिवस उलटले तरीसुद्धा या आरोपींचा शोध लागलेला नाही. आरोपींना पकडण्यासाठी तपास सीबीआयकडे द्यावा, अशा मागणीचे निवेदन हिंदू समाजाच्यावतीने पोलिस प्रशासनाला देण्यात आले आहे.



निवेदनात म्हटले आहे की, प्रशासन केवळ वेळकाढूपणा करत आहे. त्यामुळे हिंदु समाजाच्या मनात प्रचंड संताप व चीड निर्माण झालेली आहे. काही जिहादी प्रवृत्तीचे लोक, तालुक्यातील डाव्या विचारांच्या संघटना व स्वतःला विद्रोही म्हणवणारा एक वर्ग हेतुपूर्वक या प्रकरणामधे प्रशासनावर दबाव टाकून व खोटी माहिती देऊन हिंदू मुलांनाअडकवून संपूर्ण हिंदु समाजाला बदनाम करुन संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. मिळालेल्या माहितीवरुन गेल्या दोन महिन्यांपासून हे जिहादी, डावे व विद्रोही लोक बुवासिद्धदेव मंदिराच्या परिसरात संशयित हालचाली करुन शहरात दंगल घडवून आणण्याचे कारस्थान करु पाहत होते. मंदिराच्या शेजारी असलेल्या मुस्लिमम वस्तीमधे व मंदिर परिसरात या विद्रोही व्यक्तींचा कायम वावर असतो. परिसरातील जिहादि व विद्रोहि लोकांबरोबर यांच्या सततच्या बैठका चालु होत्या. घटनेच्या दिवशी ही व्यक्ती शहरात उपस्थित होती व घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीवर बारीक लक्ष ठेवून होती. घटना घडल्यावर लगेचच फेसबुक अकाउंटवर त्याने केलेल्या पोस्टवरुन असे लक्षात येते की आरोपी नेमके कोण आहेत हे घटना घडल्यापासून त्याला माहिती आहे.

पोलीस प्रशासनाने घटनेतील समाजकंटकांवर कारवाई करुन त्यांची सीबीआयद्वारे चौकशी करावी व तात्काळ घटनेचा तपास करुन मूळ आरोपीला अटक करावी. यामधील मूळ आरोपीला अटक न करता या वरील समाजकंटकाच्या दबावाला बळी पडून प्रशासनाने निरपराध हिंदुना अडकविण्याचे काम करु नये अन्यथा संपुर्ण महाराष्ट्रात हिंदु समाज रस्त्यावर उतरेल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.निवेदनावर प्रवीण राऊत, सागर भदे, प्रतीक सुरवसे, सुरज गुलदगड, अमोल शिंदे, महेश कुलकर्णी, रुद्राक्ष झिने, योगेश पाटील, साहिल सुरवसे, सत्यम दहिवाळकर, कार्तिक शिंदे, अशोक भदे, कार्तिक मोती तेवर, दीपक गुलदगड, सुरज महांडुळे, गणेश कोहकडे, सतीश माने आदींच्या सह्या आहेत.

## माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील भाजपचे युवा नेते तसेच नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम यांच्यावर धारदार हत्यार व लोखंडी रॉडने डोक्यावर वार करून त्यांच्यावर खुनी हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात १० ते १५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राहुरी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत सत्यजित कदम यांनी म्हंटले आहे की, देवळाली प्रवरा येथे विश्वकर्मा चौकात दरवर्षी नांदगाव तालुक्यातील दिंडी येत असते. या दिंडीसाठी मी व माझे इतर सहकारी जेवण देत असतो. तेव्हा मी व माझे सहकारी मित्र मंगेश ढुस विश्वकर्मा चौकात जात असताना विश्वकर्मा चौकात रस्त्यावर मुद्दाम काही युवक हे महिलांना घेऊन, लहान मुलांसोबत भांडण करत होते. तेव्हा मी माजी नगराध्यक्ष या नात्याने भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी सदरील इसम हे पूर्वनियोजित कट करुनच थांबले होते. भांडण करीत असलेल्या इसमामधिल लोकांच्या हातातील धारदार हत्याराने व लोखंडी रॉडने मला जिवे ठार मारण्याचे उद्देशाने माझ्या डोक्यावर मारुन गंभीर जखमी केले. माझ्या डोक्याला गंभीर जखम झाल्याने मी रक्त भंबाळ झालो व मी भोवळ येऊन खाली पडलो. त्याचा फायदा घेत भांडण करणाऱ्या लोकांसोबत असणाऱ्या महिलांनी माझ्या गळ्यातील पाच तोळ्याची सोन्याची चेन तोडून घेतली. सहकारी मंगेश ढुस यासही त्यांनी मारहाण केली, कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मयुर विजय पवार, खंड्या उर्फ विजय इथापे, काळ्या उर्फ राजेंद्र भाऊसाहेब बर्डे, राहुल माळी, सविता विजय पवार व इतर ४ ते ५ पुरुष व ५ ते ६ महिला यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींमध्ये एका अल्पवयीन मुलाचा समावेश असल्याचे समजले. घटनेचा तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु असून अद्याप एकाही आरोपीला अटक झाली नसल्याचे समजते.

## बिबट्याने जिरी शिवारात वृद्धेचा पाडला फडशा

### संतप्त ग्रामस्थांचा प्रशासनाविरोधात एल्गार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : पहाटेच्या दरम्यान प्रातःविधीसाठी घराबाहेर पडलेल्या ६५ वर्षीय महिलेवर बिबट्याने हल्ला करून १०० मीटर फरफटत नेत फडशा पाडल्याची घटना जिरी – लोढरा शिवाराच्या सीमाभागावर काल (दि.१) घडली. झुंबरबाई माणिकराव मांदडे (वय ६५, रा.जिरी, ता.वैजापूर) असे हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की झुंबरबाई मांडदे या आपल्या सून –मुलांसह गट.क्र.२८ मधील शेतात वास्तव्यास होत्या. दरम्यान पहाटे प्रातःविधीसाठी घराबाहेर पडल्या असता बिबट्याने अचानक झडप घालून महिलेस फरफटत नेले व गंभीर जखमी करून ठार केले. ३ वर्षीय मुलींवर हल्ला करून बिबट्याने ठार केल्याची घटना ताजी असतानाच आठ दिवसातील याच परिसरातील दुसऱ्या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे वारंवार हल्ल्याच्या घटना घडूनही वनविभाग सुस्त झोपेचे सोंग घेत असल्याने व बिबट्याला जेरबंद करण्यास अयशस्वी ठरत असल्याने निष्पाप जीवांना आपला जीव गमवावा लागत आहे डोंगरथडी भागात गेल्या काही महिन्यात मस्तवाल बिबट्याने हैदोस घातल्याने घटनांची मालिका सुरूच आहे. यामध्ये माणसांसह पाळीव जनावरे, पशुधन, लहान बालके यांच्यावरील हल्ल्यांचा समावेश आहे.वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाल्यानंतर नागरिकांनी अधिकारी कर्मचाऱ्यास चांगलेच फैलावर घेतले. जोपर्यंत बिबट्याला जेरबंद करत नाही तोपर्यंत अंत्यसंस्कार करणार नाही असा पवित्रा नागरिकांनी घेतला होता.



घटनेची मालिका थांबत नसल्याने शेतवस्तीवरील नागरिकांना घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. प्रशासनाने दोन दिवसात उपाययोजना न केल्यास प्रशासनाच्या विरोधात परिसरातील नागरिकांच्यावतीने रास्ता रोको करण्यात येईल

**-बाळासाहेब भोसले,**
**मा. तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

## चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीला चोवीस तासात ठोकल्या बेड्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : चोरीचा गुन्हा उघडकीस आणून गुन्ह्यातील आरोपीला चोवीस तासाच्या आत पकडून बेड्या ठोकण्याची कामगिरी परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने केली आहे. कृष्णा नारायण भोसले असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

यााबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, २८ मार्चला पहाटेच्या सुमारास सुरज राज पठारे (वय २४, रा. नेवासा) यांची ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल तसेच श्रीपार्वती ऑईल अँन्ड प्रोडक्ट या दुकानात चोरी झाली होती. दुकानातील ६६ हजार ५०० रुपये किमतीच्या किराणा साहित्याची चोरी झाली होती. याबाबत नेवासा पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली होती. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.



घटनेतील आरोपींचा शोध घेण्यासाठी संतोष खाडे यांनी पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, पो. हे.काँ.अजय साठे, पो.कॉ.सुमित करंजकर, पो.कॉ.नारायण डमाळे, पो.कॉ अप्पासाहेब तांबे, पो.कॉ. श्रीनाथ गवळी, पो.कॉ. अरविंद वैद्य यांच्या पथकाने आरोपीला शिताफीने अटक केली. पथकाने त्यांच्या गोपनीय खबऱ्यांकडून माहिती प्राप्त केली की, चोरी नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील कृष्णा नारायण भोसले याने त्याच्या साथीदारासह केली आहे. आरोपी नेवासा फाटा शिवारातील गाढव नाला येथील पारधी वस्तीवर असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. माहितीनुसार गाढव नाला येथील पारधी वस्तीवर जाऊन पथकाने सापळा लावला. आरोपी कृष्णा पोलिसांना पाहताच पळून जायला लागला असताना पथकातील पोलीस अंमलदार नारायण डमाळे यांनी पाठलाग करुन त्यास पकडले. त्याच्याकडे गुन्हयाबाबत विचारपूस केली असता, त्याने गुन्हा कबूल केल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. पुढील तपास पो.हे. कॉ. अजय साठे करीत आहेत. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला,श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील यांच्या मागदर्शनाखाली नेवासा पोलीस स्टेशनचे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे व पोलीस निरीक्षक धंनजय जाधव यांनी व त्यांच्या पथकातील अधिकारी पोलीस उपनिरीक्षक विकास पाटील, अजय साठे, सुमित करंजकर, नारायण डमाळे, अप्पासाहेब तांबे, श्रीनाथ गवळी, अरविंद वैद्य यांनी केली आहे.

## दै.राष्ट्र सह्याद्रीची डायरी वकिलांना मार्गदर्शक ठरेल : न्या.नागरे

### जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : संपूर्ण जिल्ह्यात वकील बंधूंना वाटप करण्यात आलेली दैनिक राष्ट्र सह्याद्रीची डायरी सर्व कायदेविषयक सल्लागारांना मार्गदर्शक ठरेल, असे मत शिर्डी येथील नव्यानेच न्यायाधीशाची परीक्षा पास झालेले वकील अ‍ॅड. अभिषेक नागरे यांनी व्यक्त केले.

दै.राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या वतीने संपादक करण नवले व कार्यकारी संपादिका पूनम नवले यांच्या दूरदृष्टीतून जिल्ह्यातील सर्व न्यायालयातील वकिलांना मार्गदर्शक ठरावी अशी डायरी तयार करण्यात आली आहे. तिची छपाई श्रीरामपूर एमआयडिसीमधील दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या छापखान्यात करण्यात आली आहे. छपाईवेळी नामवंत कायदे विषयक सल्लागारांच्या मार्गदर्शनातून सदर डायरी बनवण्यात आली आहे. राष्ट्र सह्याद्रीच्या जिल्ह्यातील सर्व वार्ताहरांमार्फत प्रत्येक न्यायालयातील वकिलांना डायरीचे वितरण सुरु आहे. राष्ट्र सह्याद्रीचे शिर्डी तालुका प्रतिनिधी अशोक दुर्शिंग यांनी शिर्डी, राहाता येथील वकिलांच्या भेटी घेत त्यांना दैनिक राष्ट्र सह्याद्री जनमानसात क्रांती घडविण्यासाठी अहोरात्र कष्ट घेत असल्याची जाणीव करून देत आहे. या मोहिमेला प्रचंड प्रतिसाद लाभत असून निर्भिड लिखाणामुळे येत्या काळात फक्त दैनिक राष्ट्र सह्याद्रीच जिल्ह्याचे मुखपत्र ठरेल, असा विश्वास सर्व वकील बांधवांनी व्यक्त केला आहे.

छापखान्यातील मशिनरी अत्याधुनिक असून नाशिक आणि नगर जिल्हयात प्रत्येकी एकच अशी मशिनरी आहे. त्या पैकी राष्ट्र सह्याद्रीची छपाई मशिन जर्मनी येथून आयात करण्यात आली आहे. आजच्या घडीला जिल्ह्यात फक्त आमचीच यंत्रणा अद्यावयत असून कोणताही आणि कितीही मोठा जॉब प्रिटींग करण्यास आम्ही सक्षम आहोत. यामुळे महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात छपाईच्या आर्डर्स मिळू लागल्या आहेत.

**- पूनम नवले, कार्यकारी संपादिका, दैनिक राष्ट्र सह्याद्री**


## आश्विनीकुमारने केकेआरची फलंदाजी उद्ध्वस्त केली

### मुंबईचा केकेआरवर आठ गडी राखून मोठा विजय

पहिल्या दोनही सामन्यात पराभव झाल्याने डिवचल्या गेलेल्या मुंबईच्या संघाने अखेर कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध एकतर्फी विजय मिळवून आपयपीएलच्या या हंगामातील आपल्या विजयी अभियानाला सुरूवात केली आहे. मुंबईच्या विजयाचा हिरो ठरला तो आयपीएलमध्ये पदार्पण करणारा नवखा पंजाबचा आश्विनीकुमार. डावखुऱ्या हाताने वेगवान गोलंदाजी करणाऱ्या आश्विनीने कोलकाता नाईट रायडर्सची फलंदाजी अक्षरशः उदध्वस्त केली. केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे, रिंकूसिंह, मनीष पांडे व आंद्रेरसेल यांना बाद करून मुंबईला एकहाती विजय मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. पहिल्या दोन सामन्यात मुंबई इंडियन्सला अनुक्रमे चेन्नई सुपर किंग्ज व गुजरात टायटन्सविरुद्ध पराभव स्वीकारावा लागला होता. त्यामुळे आत्मसन्मान दुखावलेल्या मुंबईच्या संघाने या सामन्यात जोरदार पुनरागमन करत केकेआरवर विजय मिळवून गुणतालिकेत खाते उघडले. पहिल्या काही सामन्यात पराभव पत्करल्यानंतर मुंबईचा संघ जोरदार पुनरागमन करतो, हा इतिहास असल्याने मुंबईच्या सुपर फोरच्या आशा जिंवत झाल्या आहेत. आश्विनीच्या झंझावती गोलंदाजीसमोर केकेआरच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. त्यामुळे त्यांना निर्धारित २० षटकेही खेळून काढता आली नाहीत. आश्विनीसोबतच मुंबईच्या ट्रेंट बोल्ट, दीपक चहर, हार्दिक पांड्या, मिचेल सॅन्टनर यांनीही उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने केकेआरला सव्वाशे धावांचा टप्पाही गाठता आला नाही. अवघ्या ११६ धावांत त्यांचा पूर्ण संघ बाद झाला. मुंबईने हे आव्हान अवघ्या १०.५ षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार करून आठ गडी राखून मोठा विजय मिळवला.



तो आला, त्याने पाहिले आणि सर्वांना जिंकून घेतलेल्या आश्विनी हा केकेआरच्या फलंदाजांचा कर्दनकाळ ठरला. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या केकेआरची सुरूवात अतिशय खराब झाली. सलामीवीर सुनील नारायण व सूर गवसलेला क्विंटन डिकॉक हे पहिल्या आणि दुसऱ्याच षटकात बाद झाले. पहिल्याच षटका गडी बाद करण्यात माहीर असलेल्या बोल्टने धोकादायक नारायणला बाद केले, तर दीपक चहरने डिकॉकला तंबूचा रस्ता दाखवला. पहिले दोन गडी झटपट बाद झाल्यानंतरही कर्णधार अजिंक्य रहाणे व अंगिक्रिश रघुवंशी यांनी या दोघांवर आक्रम केले. चौकार आणि षटकारांचे काही सुरे्क फटके त्यांनी मारले. त्यामुळे केकेआर सन्मानजनक धावसंख्या उभारेल, अशी आशा केकेआरच्या चाहत्यांना वाटू लागली होती. मात्र पॉवरप्ले संपण्याच्या आतच मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याने आयपीएलमध्ये पदार्पण करणाऱ्या आश्विनीच्या हाती चेंडू सोपवला आणि केकेआरच्या फलंदाजांची दुर्दशा सुरू झाली. त्याने पहिल्याच षटकातील पहिल्याच चेंडूवर कर्णधार अजिंक्य रहाणेला बाद केले. आणि तेथून पुढे एकतास फक्त आश्विनी शो चालू होता. पॉवर प्लेच्या पहिल्या सहा षटकातच केकेआरने चाग गडी गमावले होते. त्यात




**आफ्टर द मॅच**
**गिरीश कुलकर्णी**

उपकर्णधार व्यंकटेश अय्यरचाही समावेश होता. व्यंकटेशला एक जीवदानही मिळाले. मात्र त्याचा तो फायदा उठवू शकला नाही. दीपक चहरने त्याला बाद केले. त्याने फक्त तीन धावा केल्या. एकबाजू लावून धरून खेळणाऱ्या रघुवंशीला हार्दिक पांड्याने बाद केले. त्याने सर्वाधिक २६ धावा केल्या. केकेआरच्या सर्व आशा मनीष पांडे, रिंकूसिंह व आंद्रे रसेल यांच्यावर होत्या. मात्र या तिघांनाही आश्विनीने बाद करून मुंबईच्या मोठ्या विजयाचा पाया रचला. त्याने प्रथम रिंकूसिंहला बाद केले. त्याने १७ धावा केल्या. त्यानंतर त्याने पांडे आणि रसेलला बाद करून मुंबईच्या चाहत्यांना आनंदोत्सव साजरा करण्याची संधी उपलब्ध करून दिली. हे तिघेही झटपट बाद झाल्याने केकेआरचे उरलेले फलंदाज पूर्ण २० षटकेही फलंदाजी करून शकले नाहीत. रमणदीपने केलेल्या २२ धावांमुळे केकेआरल्या शंभरी पार करता आली. मात्र त्यांचा पूर्ण संघ अवघ्या ११६ धावांत गारद झाला.

छोट्याशा लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्मा आणि रयान रिकेल्टनने मुंबईला चांगली सुरूवात करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ५.२ षटकांत ४६ धावांची भागीदारी केली. रोहित शर्माला लय मिळवण्यासाठी ही चांगली संधी होती. मात्र तो त्याचा लाभ उठवून शकला नाही. त्याला खेळपट्टीवर टिकून राहता आले नाही. रोहितने १ षटकाराच्या मदतीने १२ चेंडूत १३ धावा केल्या. इंग्लंडचा आक्रमक फलंदाज रियान रिकेल्टन पहिल्या दोन्ही सामन्यात अपयशी ठरला होता. मात्र या सामन्यात त्याने पाच चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ४१ चेंडूवर नाबाद ६२ धावा कुटल्या. सूर्यकुमार यादवने ९ चेंडूत २७ धावांची आक्रमक खेळी करून मुंबईच्या पहिल्या विजयावर शिक्कामोर्तभ केले. नाबाद राहिले. केकेआरकडून आंद्रे रसेलने दोन गडी बाद केले.